**आजचे पंचांग**

गुरुवार, दि. १९ मार्च २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, चैत्र मास, शुक्लपक्ष, अमावास्या सकाळी ६-५४ पर्यंत, दिवस नक्षत्र–उत्तराभाद्रपदा रात्री (पहाटे पर्यंत) ४-०५ पर्यंत, चंद्र रास- मीन, सूर्य रास = मीन, गुरु रास= मिथुन

# दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...






आरएनआय : MAHMAR/2021/85884 | गुरुवार , दि. १९ मार्च, २०२६ | वर्ष - १ | अंक - १७३ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### चंदीगडमधील बाजारात भीषण आग

**चंदीगड** : शहरातील सर्वात व्यस्त व्यापारी क्षेत्रांपैकी एक असलेल्या सेक्टर २२ मधील एका शोरूमला बुधवारी भीषण आग लागली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. आग विझवण्यासाठी सुमारे तीन तास लागले आणि ३० हून अधिक अग्निशमन दलाच्या गाड्या लागल्या, असे त्यांनी सांगितले. सुरुवातीला एका फोटो लॅबच्या दुकानाच्या पहिल्या मजल्यावर आग लागली आणि ती वेगाने दुसऱ्या मजल्यावर पसरली. शोरूम पूर्णपणे जळून खाक झाले.

### राजधानी दिल्लीत ९३ उद्योगांना नोटीसा

**नवी दिल्ली** : हैदरपूर पुनर्विकास क्षेत्रातील ९३ औद्योगिक युनिट्सना आवश्यक परवानग्यांशिवाय कार्यरत असल्याप्रकरणी दिल्ली प्रदूषण नियंत्रण समितीने बंद करण्याच्या नोटिसा बजावल्या आहेत, असे अधिकाऱ्यांनी बुधवारी सांगितले. राजधानीतील औद्योगिक प्रदूषण रोखण्यासाठी राबवण्यात येणाऱ्या अंमलबजावणी मोहिमेचा हा एक भाग आहे. डीपीसीसीने केलेल्या पडताळणी मोहिमेत हे युनिट्स आवश्यक मंजुरीशिवाय कार्यरत असल्याचे आणि प्रदूषणाच्या नियमांचे कथित उल्लंघन करत असल्याचे आढळल्यानंतर ही कारवाई करण्यात आली आहे.


### कर्तव्यात कसूर, दोन अधिकाऱ्यांना नोटीस

**पालघर:** जिल्ह्यातील मोखाडा पंचायत समितीच्या गट विकास अधिकाऱ्यांनी कर्तव्यात कसूर आणि प्रशासकीय गैरशिस्त असल्याच्या आरोपावरून एका विस्तार अधिकारी आणि एका ग्रामपंचायत अधिकाऱ्याला कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. विस्तार अधिकारी (पंचायत) सुनील दत्तात्रय पाटील आणि ग्रामपंचायत अधिकारी महेंद्र काशीनाथ उबाळे यांना १७ मार्च रोजी नोटीस बजावण्यात आली.

महसूल विभागाचा सर्वात मोठा घोटाळा

# लाखो शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यात फेरफार!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई** : महाराष्ट्राच्या महसूल विभागात मोठी खळबळ उडवणारा सातबारा फेरफार प्रकरण उघड झाले असून, ७/१२ उताऱ्यात बेकायदेशीर बदल करून तब्बल १ ते १.५ लाख शेतकऱ्यांची फसवणूक झाल्याची कबुली सरकारने विधान परिषदेत दिली आहे. महाराष्ट्र जमीन महसूल कायद्यातील कलम १५५ चा चुकीचा अर्थ लावून काही महसूल अधिकाऱ्यांनी हे आदेश पारित केल्याचे समोर आले आहे.

जमीन महसूल कायद्यातील कलम १५५ चा वापर मुख्यतः ७/१२ उताऱ्यातील लेखनदोष किंवा शुद्धलेखनातील चुका दुरुस्त करण्यासाठी केला जातो. मात्र, पुणे जिल्ह्यात काही महसूल अधिकाऱ्यांनी या कलमाचा गैरवापर करून जमिनीच्या मालकी हक्कांतच बदल केल्याचे उघड झाले. जुलै-ऑगस्ट २०२५ दरम्यान हा प्रकार समोर आल्यानंतर महसूल विभागात मोठी खळबळ उडाली.

या प्रकरणाकडे आमदार अनिल परब यांनी लक्ष वेधल्यानंतर विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्यात आली. समितीच्या अहवालात अनेक धक्कादायक बाबी समोर आल्या. मूळ मालकाची संमती नसताना ७/१२ उताऱ्यात बदल करण्यात आल्याचे, नियमबाह्य पद्धतीने बेकायदेशीर आदेश काढण्यात आल्याचे, तसेच जमिनी बिगरशेती करताना आणि मालकी हस्तांतरणाच्या प्रक्रियेत गंभीर अनियमितता झाल्याचे स्पष्ट झाले.

**महसूल विभागात खळबळ**

- सातबारा उताऱ्यातील बेकायदेशीर फेरफार प्रकरणामुळे खळबळ
- कलम १५५ चा गैरवापर करून १.५ लाख शेतकऱ्यांची फसवणूक
- लेखनदोष दुरुस्तीच्या नावाखाली मालकी हक्कांतच बदल
- विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती
- दोषी महसूल अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आश्वासन

या मुद्द्यावर विधान परिषदेत वादळी चर्चा झाली. त्यावेळी मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनीही हा प्रकार अत्यंत गंभीर असल्याचे मान्य केले. शुद्धलेखनातील बदलाच्या नावाखाली सातबारा बदलण्यात आल्याची बाब गंभीर असून महसूल खात्याच्या इतिहासातील हा सर्वात मोठा घोटाळा असू शकतो, असे त्यांनी सभागृहात सांगितले. सुमारे १ ते १.५ लाख शेतकरी या प्रक्रियेत भरडले गेल्याची कबुलीही त्यांनी दिली.

दरम्यान, या घोटाळ्यातील मुख्य सूत्रधार आणि संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी आमदार अनिल परब यांनी केली आहे. सरकारनेही दोषींवर कारवाईचे संकेत दिले असून, अधिवेशन संपण्यापूर्वी संबंधितांवर कारवाई करू, असे आश्वासन मंत्री बावनकुळे यांनी दिले. त्यामुळे तहसीलदारांपासून वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत नेमकी कोणावर कारवाई होते, याकडे आता राज्याचे लक्ष लागले आहे.

# बंगालमध्ये निवडणूक आयोगाची मोठी कारवाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता** : विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने पश्चिम बंगालमध्ये मोठी प्रशासकीय फेरबदल कारवाई केली आहे. आयोगाने बुधवारी राज्यातील पाच वरिष्ठ आयपीएस अधिकारी आणि ११ जिल्हाधिकाऱ्यांना पदावरून हटवण्याचे आदेश दिले. जिल्हाधिकारी हेच संबंधित जिल्ह्यांचे निवडणूक अधिकारी म्हणूनही काम पाहत असल्याने या निर्णयाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

निवडणूक आयोगाचे सचिव सुजीत कुमार मिश्रा यांनी याबाबत बंगालचे मुख्य सचिव दुष्यंत नरियाला यांना पत्र पाठवले. आयोगाने स्पष्ट निर्देश दिले आहेत की, विधानसभा निवडणुका पूर्ण होईपर्यंत बदली करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांना निवडणुकीशी संबंधित कोणतीही जबाबदारी दिली जाणार नाही.

दरम्यान, या निर्णयावर मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. त्यांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पत्र लिहून अशा कारवायांपासून परावृत्त व्हावे असे आवाहन केले होते. त्यांनी म्हटले होते की, २०२६ च्या विधानसभा निवडणुकांची घोषणा झाल्यानंतर काही तासांतच राज्याच्या प्रशासकीय यंत्रणेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांना हटवणे ही अत्यंत चिंताजनक आणि आश्चर्यकारक बाब आहे. या कारवाईमुळे पश्चिम बंगालमधील निवडणूक वातावरण अधिक तापण्याची चिन्हे दिसत आहेत. निवडणूक प्रक्रियेत तटस्थता आणि पारदर्शकता राखण्यासाठी आयोगाने हे पाऊल उचलल्याचे मानले जात आहे.

# जुन्या वाहनांवरील पर्यावरण कर वाढविण्याचा निर्णय

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : महाराष्ट्र मोटार वाहन कर (सुधारणा) विधेयक, २०२६ आज विधिमंडळात एकमताने मंजूर झाले. पर्यावरण संरक्षण, आर्थिक शिस्त आणि औद्योगिक विकास यांचा समतोल साधण्याच्या दृष्टीने हे विधेयक महत्त्वाचे मानले जात आहे. वाढत्या वायू प्रदूषणावर नियंत्रण मिळवण्यासाठी जुन्या आणि प्रदूषणकारी वाहनांवरील पर्यावरण कर वाढवण्याचा निर्णय यामधून घेण्यात आला असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

सुधारित कररचनेनुसार दुचाकी वाहनांसाठी पर्यावरण कर २,००० रुपयांवरून ४,००० रुपये, पेट्रोल वाहनांसाठी ३,००० रुपयांवरून ६,००० रुपये, तर डिझेल वाहनांसाठी ३,५०० रुपयांवरून ७,००० रुपये करण्यात आला आहे. हा कर पाच वर्षांसाठी एकरकमी आकारला जाणार आहे. या बदलामुळे राज्याला दरवर्षी सुमारे १६० कोटी रुपयांपेक्षा अधिक अतिरिक्त महसूल मिळण्याची अपेक्षा आहे. हा निधी रस्ता सुरक्षा, आधुनिक परिवहन सुविधा, एटीएस प्रणाली आणि प्रशिक्षणासाठी वापरला जाणार आहे.

औद्योगिक क्षेत्रालाही या विधेयकातून दिलासा देण्यात आला आहे. क्रेन वाहनांवरील मोटार वाहन करासाठी ३० लाख रुपयांची कमाल मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. त्यामुळे बांधकाम आणि पायाभूत सुविधा क्षेत्रातील गुंतवणुकीला चालना मिळेल, अशी अपेक्षा आहे. या विधेयकामुळे बीएस-६ आणि इलेक्ट्रिक वाहनांचा स्वीकार वाढण्यास प्रोत्साहन मिळेल, तसेच पर्यावरणीय धोरणाला बळकटी मिळेल, असेही सांगण्यात आले. ग्रामीण आणि आदिवासी भागात रोजगारनिर्मितीला चालना मिळण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

स्वयंघोषित अंकशास्त्रज्ञाचे राजकीय लागेबांधे उघडकीस

# महिला आयोग खरेच सुरक्षित आहे का?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : नाशिकमध्ये स्वयंघोषित अंकशास्त्रज्ञ अशोक खरात अटकेत गेल्यानंतर उघड होत असलेल्या धक्कादायक बाबींनी केवळ गुन्हेगारी तपासालाच नवे वळण दिलेले नाही, तर राज्य महिला आयोगाच्या नैतिक विश्वसनीयतेवरही गंभीर प्रश्नचिन्ह उभे केले आहे. महिलांना न्याय, आधार आणि संरक्षण देणाऱ्या संस्थेच्या प्रमुख व्यक्तीचे नाव जर अशा वादग्रस्त व्यक्तीशी जोडले जात असेल, तर 'महिला आयोग सुरक्षित हातात आहे का?' हा प्रश्न आता टाळता येत नाही.

स्वत:ला 'कॅप्टन' म्हणवून घेणारा अशोक खरात याला ३५ वर्षीय महिलेवर गुंगीचे औषध देऊन



बलात्कार केल्याच्या आरोपावरून नाशिक गुन्हे शाखेने अटक केली. या अटकेनंतर त्याचे राजकीय, सामाजिक आणि तथाकथित आध्यात्मिक वर्तुळातील संबंध समोर येऊ लागले. मात्र, त्यातील सर्वात अस्वस्थ करणारी बाब म्हणजे राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्याशी संबंधित छायाचित्रे आणि नाते.रुपाली चाकणकर या खरातच्या पाया पडताना आणि त्याचे 'पाद्यपूजन' करताना एका छायाचित्रात दिसत असल्याचा दावा समोर आला आहे. हा केवळ वैयक्तिक श्रद्धेचा मुद्दा म्हणून बाजूला सारता येणार नाही. कारण ज्या पदावर बसून महिलांवरील अत्याचार, छळ, अन्याय आणि शोषणाच्या तक्रारींना न्याय द्यायचा, त्या पदावरील व्यक्ती एका भोंदू, वादग्रस्त आणि आता गंभीर गुन्ह्यात अडकलेल्या व्यक्तीसमोर अशा स्वरूपात नतमस्तक होत असल्याचे चित्र समाजात अत्यंत चुकीचा संदेश देते.

महिला आयोग ही केवळ सल्लागार किंवा प्रतीकात्मक संस्था नाही. ती राज्यातील महिलांसाठी विश्वासाची, संरक्षणाची आणि नैतिक आधाराची यंत्रणा आहे. अशा संस्थेच्या प्रमुख व्यक्तीवर जर विवेकशून्य जवळीक, अंधश्रद्धाळू वर्तन किंवा संशयास्पद संबंधांचे सावट पडत असेल, तर आयोगाच्या प्रत्येक निर्णयावर, प्रत्येक भूमिकेवर आणि प्रत्येक हस्तक्षेपावर प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे.

चाकणकर या खरातच्या मंदिर ट्रस्टच्या विश्वस्त असल्याचेही समोर येत असल्याने प्रकरण अधिक गंभीर बनते. कारण येथे फक्त 'ओळख' नाही, तर संस्थात्मक नाते असल्याचा आभास निर्माण होतो. अशा परिस्थितीत, एखाद्या पीडित महिलेने महिला आयोगाकडे विश्वासाने कसे जावे? ज्या व्यक्तीवर महिलांच्या सन्मानाचे रक्षण करण्याची जबाबदारी आहे, त्या व्यक्तीची निर्णयक्षमता आणि नैतिकता जर अशा वर्तुळात गुरफटलेली दिसत असेल, तर हा प्रश्न केवळ राजकीय नसून सामाजिक आहे.

या प्रकरणात तपास यंत्रणा आपले काम करेलच; मात्र महिला आयोगासंबंधी निर्माण झालेल्या शंकांचे निरसन करणे तेवढेच महत्त्वाचे आहे. रुपाली चाकणकर यांनी या नात्याविषयी, त्या छायाचित्रांविषयी, ट्रस्टशी असलेल्या संबंधांविषयी आणि अशोक खरातबाबतच्या स्वत:च्या भूमिकेविषयी स्पष्ट खुलासा करणे आवश्यक आहे. हा विषय एका व्यक्तीच्या प्रतिमेपुरता मर्यादित नाही; तो महिलांच्या न्यायव्यवस्थेवरील विश्वासाशी जोडलेला आहे. महिला आयोगाच्या प्रमुख पदावर बसलेल्या व्यक्तीचे आचरण निर्दोष, संवेदनशील आणि निखळ विश्वसनीय असणे ही केवळ अपेक्षा नाही, तर किमान अट आहे.

भारतीय तेल कंपन्यांकडून मागणीत अचानक वाढ

# चीनऐवजी भारताकडे वळली ७ तेलवाहू जहाजे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : चीनकडे निघालेली किमान सात रशियन तेलवाहू जहाजे प्रवासादरम्यान भारताकडे वळवण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. भारतीय तेल शुद्धीकरण कंपन्यांकडून अचानक वाढलेल्या मागणीमुळे हा बदल करण्यात आल्याचे आंतरराष्ट्रीय वृत्तसंस्थांच्या अहवालांत म्हटले आहे.

रशियन तेलवाहू 'अॅक्वा टायटन' या जहाजाने मूळतः चीनच्या रिझाओ बंदराकडे जाण्याचा संकेत दिला होता. मात्र, नंतर त्याचा मार्ग बदलून



भारतातील मंगळूरकडे वळवण्यात आला. हे जहाज २१ मार्च रोजी मंगळूर येथे पोहोचण्याची शक्यता आहे. याशिवाय 'झुझोउ एन' हे सुएझमॅक्स प्रकारातील दुसरे जहाजही चीनऐवजी भारतातील सिक्का बंदराकडे वळवण्यात आले आहे. मध्यपूर्वेतील तणाव आणि कच्च्या तेलाच्या पुरवठ्यावर निर्माण झालेल्या दबावाच्या पार्श्वभूमीवर भारताने रशियन तेल खरेदीत वाढ केल्याचे मानले जात आहे. अमेरिकेने समुद्रात आधीच भरलेले रशियन तेल खरेदी करण्यासाठी मर्यादित कालावधीची सवलत दिल्यानंतर या हालचालींना वेग आल्याचे सांगितले जात आहे.

अहवालानुसार, भारतीय रिफायनऱ्यांनी अल्पावधीत मोठ्या प्रमाणात रशियन कच्च्या तेलाची खरेदी केली आहे. मध्यपूर्वेतून होणाऱ्या संभाव्य पुरवठा तुटवड्याची भरपाई करण्यासाठी भारताने हा पर्याय स्वीकारल्याचे बोलले जात आहे. चीन हा रशियन तेलाचा मोठा ग्राहक बनला होता. मात्र, नव्या परिस्थितीत भारत पुन्हा आक्रमक खरेदीदार म्हणून समोर आल्याने चीनकडे जाणाऱ्या काही खेपा भारताकडे वळवण्यात आल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. ऊर्जा सुरक्षेच्या दृष्टीने भारतासाठी ही घडामोड महत्त्वाची मानली जात असून, जागतिक तेल बाजारातील बदलत्या समीकरणांचेही ती द्योतक ठरत आहे.

## निवडणुकांसाठी २५ लाख कर्मचारी तैनात

**नवी दिल्ली** : पुढील महिन्यात होणाऱ्या पाच विधानसभा निवडणुकांसाठी ८.५ लाख सुरक्षा कर्मचाऱ्यांसह तब्बल २५ लाख कर्मचारी तैनात केले जातील, असे निवडणूक आयोगाने बुधवारी सांगितले. पश्चिम बंगाल, तामिळनाडू, केरळ, आसाम आणि पुदुचेरी येथील निवडणुकांमध्ये १७.४ कोटी मतदार मतदान करण्यास पात्र आहेत. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी असे प्रतिपादन केले होते की, निवडणुका हिंसाचारमुक्त आणि प्रलोभनमुक्त व्हाव्यात यासाठी अधिकाऱ्यांना पूर्णपणे निष्पक्षपणे काम करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, असे नमूद केले आहे.

# कांदा उत्पादक पुन्हा संकटात सापडला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नाशिक** : कांद्याच्या घसरलेल्या दरामुळे राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी पुन्हा संकटात सापडला आहे. नाशिक जिल्ह्यात सध्या कांद्याला प्रतिक्विंटल केवळ ७०० ते ८०० रुपये दर मिळत असून, या दरातून उत्पादन खर्चही निघत नसल्याची संतप्त भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे कांद्याला हमीभाव द्यावा, विकलेल्या कांद्यावर प्रतिक्विंटल ५०० रुपये अनुदान द्यावे, अन्यथा गांजा लागवडीची परवानगी द्यावी, अशी टोकाची मागणी नांदगाव तालुक्यातील शेतकऱ्यांनी केली आहे.

पश्चिम आशियातील युद्धजन्य



परिस्थिती, निर्यातीवरील परिणाम आणि देशांतर्गत वाढलेली आवक यामुळे कांद्याच्या बाजारभावावर दबाव वाढला आहे. इराण-इस्रायल-अमेरिका संघर्षामुळे पश्चिम आशियातील बाजारपेठांमध्ये अनिश्चितता निर्माण झाली असून, भारतातून होणारी कांदा निर्यात मंदावल्याचा फटका थेट नाशिकच्या बाजारपेठांना बसत आहे. नाशिकमधून मोठ्या प्रमाणात कांदा निर्यात होत असते. मात्र सध्याच्या परिस्थितीत निर्यात ठप्प झाल्याने देशांतर्गत पुरवठा वाढून दर कोसळल्याचे चित्र आहे.

ऐन सणासुदीच्या काळातही कांद्याचे भाव उभारी घेत नसल्याने शेतकरी अधिकच हवालदिल झाला आहे. बियाणे, खत, मजुरी, वाहतूक आणि साठवणूक यांचा खर्च वाढलेला असताना मिळणारा बाजारभाव अत्यंत अपुरा असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे शासनाने तातडीने हस्तक्षेप करून कांद्याला हमीभाव जाहीर करावा किंवा विक्री झालेल्या कांद्यावर थेट अनुदान द्यावे, अशी मागणी जोर धरत आहे.

उदात्त मानला जाणारा वकिलीचा व्यवसाय कलंकित

# टोल प्रकरणावरून सर्वोच्च न्यायालयाचा संताप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : उत्तर प्रदेशातील बाराबंकी जिल्ह्यातील हैदरगड टोल प्लाझा प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने वकिलांच्या वर्तनावर कठोर शब्दांत ताशेरे ओढले आहेत. टोल कर्मचाऱ्यांची बाजू मांडणाऱ्या वकिलाच्या कार्यालयावरच हल्ला आणि तोडफोड झाल्याने न्यायालयाने, "एकेकाळी उदात्त मानला जाणारा वकिलीचा व्यवसाय आता गुंडगिरीने कलंकित झाला आहे," असे तीव्र निरीक्षण नोंदवले.

न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि संदीप मेहता यांच्या खंडपीठाने या प्रकरणाची सुनावणी करताना



बाराबंकी बार असोसिएशनच्या सदस्यांच्या भूमिकेवर गंभीर आक्षेप घेतला. न्यायालयाने स्पष्ट केले की, कायद्याचे रक्षण करणाऱ्यांनीच हिंसाचाराचा मार्ग स्वीकारणे ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. विशेषतः उत्तर प्रदेशातील परिस्थिती या घटनेतून अधोरेखित होत असल्याचेही न्यायालयाने नमूद केले.

हे प्रकरण १४ जानेवारीचे आहे. लखनौ–सुलतानपूर महामार्गावरील हैदरगड टोल प्लाझावर रत्नेश शुक्ला नावाच्या वकिलाचा टोल कर्मचाऱ्यांशी वाद झाला. टोल शुल्क भरण्यास नकार दिल्याने हा वाद वाढला आणि त्याचे रूप हाणामारीत झाले. त्यानंतर स्थानिक वकिलांनी तीव्र भूमिका घेत माफीची मागणी केली. प्रकरण चिघळल्यानंतर पोलिसांनी टोल कर्मचाऱ्यांवर कारवाई केली, तर एनएचएआयनेही संबंधित टोल प्लाझावर पावले उचलली.

यानंतर बाराबंकीतील वकिलांनी टोल कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधित्व कोणताही वकील करणार नाही, असा ठराव केल्याचे समोर आले. मात्र, मनोज शुक्ला या वकिलाने टोल कर्मचाऱ्यांची बाजू मांडण्याचा निर्णय घेत जामिनासाठी अर्ज दाखल केला. यामुळे संतप्त झालेल्या काही वकिलांनी त्यांच्या कार्यालयात घुसून तोडफोड केली, तसेच फर्निचरला आग लावल्याचा आरोप आहे.

या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने टोल कर्मचाऱ्यांना जामीन मंजूर करताना त्यांच्या सुरक्षेबाबतही महत्त्वाचे निर्देश दिले. उत्तर प्रदेशचे पोलीस महासंचालकांनी जामीन मिळालेल्यांच्या सुरक्षेची खात्री करावी, असे आदेश न्यायालयाने दिले. तसेच या प्रकरणाची पुढील सुनावणी दिल्लीत वर्ग करण्यात आली आहे.

न्यायालयाने आपल्या आदेशात म्हटले की, टोल कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या वकिलाविरोधात बार असोसिएशनच्या सदस्यांनी केलेली गुंडगिरी निषेधार्ह आहे. वकिलांमधील बंधुभाव समजू शकतो, मात्र आरोपीच्या बचावासाठी उभ्या राहिलेल्या वकिलावर हल्ला करणे कोणत्याही परिस्थितीत समर्थनीय ठरू शकत नाही, असेही खंडपीठाने स्पष्ट केले.

यासोबतच सर्वोच्च न्यायालयाने बार कौन्सिलकडूनही कडक शिस्तभंग कारवाईची अपेक्षा व्यक्त केली. न्यायालयाच्या या तीव्र निरीक्षणामुळे वकिली पेशातील शिस्त, नैतिकता आणि कायद्याच्या राज्याविषयी पुन्हा एकदा गंभीर चर्चा सुरू झाली आहे.

# कोल्हापुरात अवकाळीचा तडाखा; गारपिटीने चिंता वाढली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोल्हापूर** : कोल्हापूर जिल्ह्यात ऐन उन्हाळ्यात अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावत नागरिकांना आणि शेतकऱ्यांना धक्का दिला आहे.

करवीर तालुक्यासह अनेक भागांत सोसाट्याच्या वाऱ्यासह मुसळधार पाऊस झाला, तर काही ठिकाणी गारपीटही झाली. या अचानक बदललेल्या हवामानामुळे घरांच्या काचा फुटल्याच्या घटनाही समोर आल्या आहेत. काही भागांत विजांच्या कडकडाटासह पाऊस कोसळल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. गेल्या काही दिवसांपासून कडक उन्हामुळे हैराण झालेल्या नागरिकांना या पावसामुळे काहीसा दिलासा मिळाला असला,



तरी शेतीपिकांचे नुकसान होण्याची भीती वाढली आहे. हवामान विभागाने राज्यात २० मार्चपर्यंत वादळी वाऱ्यासह पावसाचा इशारा दिला आहे.

अवकाळी पाऊस आणि गारपिटीचा फटका विशेषतः रब्बी हंगामातील पिकांना बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. शेतकरी वर्गाने तातडीने पिकांची काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. प्रशासनानेही नागरिकांनी आणि शेतकऱ्यांनी सतर्क राहावे, असे आवाहन केले आहे.

## संपादकीय

### भारताचे जुने द्वंद्व



**सीमेवर तणाव, व्यापारात अवलंबित्व आणि भू-राजकारणात स्पर्धा हा भारत-चीन संबंधांचे हे त्रिकोण आज नव्याने समोर आलेले नाही. परंतु चीनच्या अलीकडील धोरणात्मक हालचालींनी भारतासमोरचा प्रश्न अधिक तीव्र केला आहे: प्रतिस्पर्ध्याशी संबंध तोडायचे, की त्याच्यावर अवलंबून राहूनच स्पर्धा करायची?**

भारत-चीन संबंधांतील विरोधाभास हा नवीन नाही. १९६२ च्या युद्धानंतरही दोन्ही देशांनी व्यापार आणि राजनैतिक संबंध हळूहळू पुन्हा उभे केले. परंतु गेल्या दशकात, विशेषतः २०२० नंतरच्या सीमावादानंतर, या संबंधांचे स्वरूप अधिक गुंतागुंतीचे झाले आहे. एकीकडे सीमारेषेवर तणाव कायम आहे; दुसरीकडे चीन भारताचा सर्वात मोठा व्यापारी भागीदार राहिला आहे. ही वस्तुस्थितीच भारताच्या 'जुन्या द्वंद्वा'ची मुळं दाखवते. चीनची नव्याने आखलेली आर्थिक व सामरिक रणनीती ही केवळ विस्तारवादाची गोष्ट नाही; ती जागतिक पुरवठा साखळ्या, तंत्रज्ञान, पायाभूत सुविधा आणि प्रादेशिक प्रभाव यांचा एकत्रित खेळ आहे. 'बेल्ट अँड रोड' उपक्रम असो, हिंदी महासागरातील 'स्ट्रिंग ऑफ पर्ल्स'सारखी मांडणी असो किंवा सीमावर्ती पायाभूत सुविधांचा वेगाने होणारा विस्तार, अशी चीनची पावले एकाच वेळी अनेक स्तरांवर पडत आहेत. या पार्श्वभूमीवर भारताची भूमिका सरळरेषीय राहू शकत नाही. कारण भारतासमोरचा प्रश्न केवळ सीमावादापुरता मर्यादित नाही. तो आर्थिक, तांत्रिक आणि धोरणात्मक या तिन्ही स्तरांवर उभा आहे. उदाहरणार्थ, औषधनिर्मितीपासून इलेक्ट्रॉनिक्सपर्यंत अनेक उद्योगांमध्ये भारताचा कच्च्या मालासाठी चीनवर मोठा आधार आहे. अशा परिस्थितीत 'पूर्ण तुटवडा' हा पर्याय व्यवहार्य नाही. पण त्याच वेळी, हा अवलंबित्वाचा धागा जितका मजबूत, तितकी धोरणात्मक असुरक्षितता वाढते, हीही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. चीनच्या नव्या धोरणाचा गाभा हा 'एकाच वेळी स्पर्धा आणि सहकार्य' या तत्त्वात आहे. तो केवळ सीमांवर दबाव आणत नाही, तर शेजारी देशांमध्ये पायाभूत गुंतवणूक करून आपला प्रभाव वाढवतो. दक्षिण आशियातील लहान देशांशी वाढणारे त्याचे संबंध, पायाभूत सुविधा प्रकल्प, बंदरे आणि कर्जयोजना हे सगळे भारतासाठी केवळ आर्थिक नव्हे, तर सामरिक आव्हान आहे. 'सुरक्षा द्वंद्व' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या परिस्थितीत एका देशाची सुरक्षावाढ दुसऱ्यासाठी धोका ठरते. भारताने यावर आतापर्यंत दोन प्रकारे प्रतिसाद दिला आहे. एक म्हणजे सीमावर्ती भागात पायाभूत सुविधा आणि लष्करी तयारी वाढवणे. सिलिगुडी कॉरिडॉरसारख्या महत्त्वाच्या भागात नव्या तळांची उभारणी याचाच भाग आहे. दुसरे म्हणजे जागतिक स्तरावर अमेरिका व इतर देशांशी धोरणात्मक जवळीक वाढवणे. 'इंडो-पॅसिफिक' धोरण, क्वाडसारखे मंच, आणि पुरवठा साखळी विविधीकरणाचे प्रयत्न हे त्याचे उदाहरण. परंतु या दोन्ही उपाययोजनांना मर्यादा आहेत. लष्करी ताकद वाढवणे आवश्यक असले, तरी ते दीर्घकालीन तोडगा नाही. तसेच, पश्चिमेकडील देशांशी जवळीक वाढवताना भारताने आपली स्वायत्तता गमावू नये, हा एक वेगळाच समतोल साधावा लागतो. कारण चीन भारताला अनेकदा अमेरिकेच्या व्यापक स्पर्धेतील 'घटक' म्हणून पाहतो. त्यामुळे भारताची प्रत्येक हालचाल या मोठ्या भू-राजकीय समीकरणात वाचली जाते. यातूनच भारताचे 'जुने द्वंद्व' अधिक ठळक होते. चीनशी स्पर्धा अपरिहार्य आहे; पण त्याच्याशी पूर्ण दुरावा ठेवणे अशक्य आहे. चीनवर अवलंबून राहणे धोकादायक आहे; पण त्याशिवाय पर्याय उभा करणे वेळखाऊ आहे. सीमा सुरक्षित ठेवायची आहे; पण व्यापारही चालू ठेवायचा आहे. ही द्वंद्वात्मक स्थिती केवळ धोरणात्मक नाही; ती संरचनात्मक आहे. म्हणूनच भारतासमोरचा खरा प्रश्न 'चीनला रोखायचे कसे?' हा नसून 'चीनबरोबर स्पर्धा करतानाच स्वतःला कसे सक्षम करायचे?' हा आहे. त्यासाठी केवळ संरक्षणखर्च वाढवून भागणार नाही. उत्पादनक्षमता, तंत्रज्ञान, शिक्षण, संशोधन आणि पायाभूत सुविधा यांमध्ये दीर्घकालीन गुंतवणूक करावी लागेल. 'मेक इन इंडिया'सारख्या उपक्रमांची खरी कसोटी याच ठिकाणी आहे. त्याचबरोबर, परराष्ट्र धोरणात अधिक सूक्ष्मता आवश्यक आहे. भारताने स्वतःची सकारात्मक मांडणी उभी करावी लागेल. चीनची 'नवी चाल' ही दीर्घकालीन आहे, संयमी आहे आणि बहुआयामी आहे. त्याला उत्तर देण्यासाठी भारतानेही तितक्याच दीर्घकालीन आणि सुसंगत धोरणाची गरज आहे. तात्कालिक राजकीय घोषणांपेक्षा संस्थात्मक क्षमता अधिक महत्त्वाची ठरणार आहे. शेवटी, भारत-चीन संबंध हा शून्य-योग खेळ नाही, पण तो पूर्ण सहकार्याचाही नाही. तो एक सतत बदलणारा समतोल आहे. या समतोलात भारताने स्वतःची जागा ठरवताना भावनिक प्रतिक्रियांपेक्षा वास्तववादी धोरणाला प्राधान्य दिले, तरच हे 'जुने द्वंद्व' भविष्यातील संधीमध्ये रूपांतरित होऊ शकते. अन्यथा, चीनच्या प्रत्येक नव्या चालीसमोर भारत कायमच जुन्याच प्रश्नांमध्ये अडकून राहील.

# मुत्सद्देगिरीचा मृत्यू की शक्तीचा उन्माद?

आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये 'स्ट्रॅटेजिक इंटरेस्ट' असतात, हे खरे; पण त्या नावाखाली महासत्तांच्या अतिरेकाला गप्प राहून मान्यता देता कामा नये. अलीकडच्या घडामोडीही हेच दाखवतात. मार्च २०२६ मधील घडामोडींमध्ये इराण-इस्रायल-अमेरिका या त्रिकोणातील तणाव वेगाने वाढताना दिसला; इराणकडून अमेरिकन दलांवर इशारे देण्यात आले, तर भारतालाही अमेरिकेच्या कारवाईला नौदलाने मदत केल्याच्या दाव्यांना "बिनबुडाचे" म्हणत खुलासा करावा लागला. हे सारे केवळ एका प्रदेशापुरते मर्यादित नाही; हे जागतिक संवादयंत्रणेच्या अपयशाचे लक्षण आहे.मुत्सद्देगिरी ही काही सजावटीची गोष्ट नाही. ती युद्ध टाळण्याचे एकमेव सुसंस्कृत साधन आहे. दोन देशांत वैर असले, सीमावाद असला, प्रतिनिधी युद्धे सुरू असली, तरी दार उघडे ठेवणे हाच तिचा केंद्रबिंदू. शीतयुद्धाच्या काळात अमेरिका आणि सोव्हिएत संघ यांच्यात अविश्वास टोकाचा होता; पण 'हॉटलाइन' होती, शस्त्रनियंत्रण करार होते, बॅक-चॅनेल्स होते. आज तंत्रज्ञान प्रगत झाले, जग अधिक जोडले गेले; पण राज्यकर्त्यांचा संयम मात्र आकसला. आताच्या काळात नेतृत्वाला समजावून सांगणारा मुत्सद्दी नको असतो; टाळ्या मिळवून देणारा रणगर्जक अधिक प्रिय वाटतो. ही प्रवृत्ती धोकादायक आहे.

कारण युद्धाची भाषा नेहमी लोकप्रिय असते; शांततेची भाषा कष्टाची असते. युद्धात नकाशे रंगवले जातात, प्रतिमा घडवल्या जातात, राष्ट्रवाद तापवला जातो. शांततेत मात्र तडजोड करावी लागते, विरोधकाच्या भीतीचे कारण समजून घ्यावे लागते, स्वतःचेही काही पाऊल मागे घ्यावे लागते. म्हणूनच अनेक नेत्यांना युद्धसदृश आक्रमकता अधिक सोयीची वाटते. देशांतर्गत राजकारणात 'कणखर' प्रतिमा विकली जाते, आणि बाह्य धोरणात त्याच आवाजाला धोरण समजले जाते. अशा वेळी मुत्सद्देगिरी कमकुवत भासते; प्रत्यक्षात तीच दूरदृष्टीची कसोटी असते.

पण या घसरणीची जबाबदारी फक्त संघर्षरत देशांवर टाकून भागणार नाही. महासत्ता, विशेषतः अमेरिका, नियमाधिष्ठित जागतिक व्यवस्थेची भाषा करते;



**» बोलणी सुरू असताना युद्ध थांबवता येते. बोलणी थांबली, की रणशिंगे वाजतात. संघर्ष नव्याने उभे राहत नाहीत; पण त्यांना आवरण्याची, मर्यादा घालण्याची, समेटाचा रस्ता जिवंत ठेवण्याची जी मुत्सद्देगिरी होती, तीच कमी होत चालली आहे.**

मात्र मित्रराष्ट्रे आणि प्रतिस्पर्धी यांच्याबाबत वेगवेगळे निकष लावताना दिसते. तेव्हा प्रश्न केवळ दुटप्पीपणाचा राहत नाही; तो आंतरराष्ट्रीय नैतिकतेच्या उध्वस्त होण्याचा ठरतो. 'आमच्या मित्राने केलेले' आणि 'विरोधकाने केलेले' यासाठी स्वतंत्र नैतिक मापदंड असतील, तर संयुक्त राष्ट्रांच्या ठरावांचा, मानवाधिकारांच्या उपदेशांचा आणि आंतरराष्ट्रीय कायद्याच्या पुस्तकांचा उपयोग तरी किती? जगाला नियम हवेत; पण ते निवडक वापरासाठी नसतात.

याहूनही काळजीची बाब म्हणजे उरलेल्या जगाचे सोयीचे मौन. तेल, व्यापार, संरक्षणसंबंध, समुद्री मार्ग, स्थलांतर, गुंतवणूक या सगळ्यांच्या हिशेबात बरीच राष्ट्रे उघड बोलण्याचे टाळतात. परंतु राजकारणात मौन निरपेक्ष नसते. ते बहुधा सत्तेला लाभदायक ठरते. अन्यायाविरुद्ध स्पष्ट आवाज नाही, म्हणजे अन्यायाला वाव आहे, असा सरळ अर्थ निघतो. आज पाश्चिम आशियात जे घडते, त्याची छाया उद्या इतरत्र पडू शकते. कारण जग एकदा तरी हे पाहते की, किती हिंसा केल्यावर निषेध होतो आणि किती केल्यावर 'परिस्थितीची गुंतागुंत' सांगितली जाते.

भारतासाठी हा प्रश्न आणखी नाजूक आहे. भारताची परराष्ट्रनीती परंपरेने संतुलन, स्वायत्तता, बहुध्रुवीयता यांवर आधारलेली आहे. ती भूमिका अजूनही उपयुक्तच आहे. पण संतुलन आणि तटस्थतेच्या नावाखालील मौन यात फरक केला पाहिजे. 'आम्ही कोणाच्या गोटात नाही' हे एक; आणि 'म्हणून कोणत्याही अतिरेकावर बोलणार नाही' हे दुसरे. उदयोन्मुख शक्ती म्हणून भारताने केवळ व्यवहारकुशलतेची नव्हे, तर संवादपोषक भूमिकेचीही जाणीव ठेवली पाहिजे. कारण अस्थिर जगात व्यापारमार्ग, ऊर्जा-साखळी, परदेशस्थ भारतीय, संरक्षणसमीकरणे सगळेच धोक्यात येतात. शांततेची बाजू घेणे ही राष्ट्रीय हिताचीही आहे.

सार्वजनिक चर्चेचे रूप पाहिले, तर चित्र अधिकच खिन्न करणारे आहे. सामाजिक माध्यमांवर त्वरित निष्कर्ष, दूरचित्रवाणीवर रणधुमाळी, आणि गुंतागुंतीच्या प्रश्नांचे बालिश दोन गटांत विभाजन या सगळ्यांतून संवादासाठी आवश्यक असलेली सूक्ष्मता हरवते. मुत्सद्देगिरीचा आग्रह धरणाऱ्यांना लगेच भित्रे, गोंधळलेले किंवा 'राष्ट्रहित न समजणारे' ठरवले जाते. खरा प्रश्न असा आहे की आता फक्त शक्तीचे प्रदर्शन, क्षेपणास्त्रांची श्रेणी, आणि कोण कुणाच्या बाजूला उभा हेच महत्त्वाचे ठरले आहे? मुत्सद्देगिरीचा मृत्यू हा एका संस्थेचा किंवा एका परराष्ट्रमंत्र्याचा अपयश नसतो; तो राजकीय संस्कृतीच्या अवनतीचा इशारा असतो. जेव्हा समेट हा शब्द कमकुवत वाटू लागतो आणि सूड हा शब्द राष्ट्राभिमानाचा पर्याय ठरतो, तेव्हा जग युद्धाच्या अधिक जवळ आलेले असते. म्हणून आजची खरी गरज शस्त्रसाठा वाढवण्याची नाही; संवादाची प्रतिष्ठा परत आणण्याची आहे. बोलणी सुरू ठेवणे, मध्यस्थीला अवकाश देणे, युद्धविरामाचे राजकारण उभे करणे, आणि महासत्तांच्या अतिरेकाविरुद्ध उघड बोलणे हेच राजकारण आहे. अन्यथा उद्या इतिहास इतकेच नोंदवेल : जगाकडे शस्त्रे होती, मित्रराष्ट्रे होती, करार होते; नसली, तर फक्त बोलण्याची इच्छा.

# प्रभागातील समस्या प्राधान्याने सोडवा : महापौर रवी लांडगे

## 'ब' क्षेत्रीय कार्यालयात नागरी सुविधांबाबत आढावा बैठकीचे आयोजन

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी** : प्रत्येक प्रभागातील नगरसदस्यांनी मांडलेल्या समस्या संवेदनशीलतेने समजून घेत त्यांचे प्राधान्याने निराकरण करणे आवश्यक आहे. क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी लोकप्रतिनिधींशी सातत्याने समन्वय राखून स्थानिक अडचणींची अचूक नोंद घ्यावी आणि त्या तत्परतेने सोडवाव्यात, असे निर्देश महापौर रवि लांडगे यांनी दिले.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या 'ब' क्षेत्रीय कार्यालयात नागरी सुविधांबाबत आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत स्वच्छता व्यवस्था, पाणीपुरवठा, जलनिस्सारण, रस्ते दुरुस्ती, अतिक्रमण, स्थापत्य, सुरक्षा, कचरा व्यवस्थापन, भटके कुत्रे, उद्यानांची देखभाल तसेच इतर मूलभूत नागरी प्रश्नांवर सविस्तर चर्चा झाली. नागरिकांना भेडसावणाऱ्या मूलभूत सुविधांशी संबंधित प्रश्नांवर वेळेत कार्यवाही होणे गरजेचे आहे. प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यातील समन्वय अधिक बळकट झाल्यास विकासकामांना गती मिळू शकते, असे महापौरांनी नमूद केले.

बैठकीत संबंधित विभागांनी परिसरातील नागरिकांच्या अडचणींचे तातडीने निराकरण करण्यासाठी प्रभावी समन्वय साधावा, असे निर्देश देण्यात आले. अनावश्यक विलंब टाळून निश्चित कालमर्यादेत कामे पूर्ण करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

प्रभागनिहाय सुरू असलेल्या विकासकामांचा सखोल आढावा घेऊन आगामी कामांचे नियोजन अधिक परिणामकारक पद्धतीने करणे, प्राधान्यक्रम निश्चित करणे, निधीचा कार्यक्षम वापर सुनिश्चित करणे आणि नागरिकांच्या गरजांनुसार कामांची अंमलबजावणी करणे आवश्यक असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. नागरिकाभिमुख प्रशासनासाठी सर्व विभागांनी अधिक सजग, जबाबदारीने आणि उत्तरदायित्वाने काम करणे गरजेचे असल्याचे महापौरांनी अधोरेखित केले. तसेच प्रभागस्तरावर नियमित आढावा बैठका घेऊन समस्यांचे त्वरित निराकरण करण्यावर भर देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. या बैठकीला विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, नगरसदस्या अपर्णा डोके, मनीषा चिंचवडे, नीता पाडाळे, कोमल काळे, ऐश्वर्या तरस, रेश्मा कातळे, आशा सूर्यवंशी, पल्लवी वाल्हेकर तसेच नगरसदस्य अनंत कोऱ्हाळे, सुरेश भोईर, विनोद नढे, संतोष कोकणे, धर्मपाल तंतरपाळे, निलेश तरस आणि शेखर चिंचवडे उपस्थित होते. याशिवाय उपआयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल, क्षेत्रीय अधिकारी राजाराम सरगर, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक उपस्थित होते.

# मालमत्ताकर वसुलीला वेग

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी** : महापालिकेच्या कर संकलन विभागामार्फत शहरात मालमत्ताकर वसुलीची मोहीम अधिक तीव्र करण्यात आली आहे. नागरिकांना कर भरण्यास सुलभता मिळावी यासाठी महापालिकेचे मुख्य कार्यालय तसेच शहरातील १८ विभागीय कर संकलन कार्यालये शनिवार, रविवार आणि सार्वजनिक सुटीच्या दिवशीही सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांना सुटीच्या दिवशीही मालमत्ताकर भरता येणार आहे. महापौर रवी लांडगे यांनी नागरिकांनी मालमत्ताकराचे बिल भरून महापालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे.

या महिन्यात गुरुवारी, दि. १९ रोजी गुढीपाडवा तसेच २६ मार्च रोजी श्रीराम नवमीनिमित्त सार्वजनिक सुटी असली तरी त्या दिवशीही सर्व विभागीय कर संकलन कार्यालये नागरिकांसाठी खुली राहणार आहेत. या काळात सर्व कार्यालयांतील कॅश काऊंटर सकाळी ९.४५ ते सायंकाळी ५.४५ या वेळेत सुरू राहतील. त्यामुळे आठवड्याच्या कामकाजाच्या दिवशी वेळ काढणे शक्य नसलेल्या नागरिकांनाही सुटीच्या दिवशी कर भरण्याची सुविधा मिळणार आहे.

महापालिकेकडून ऑनलाईन कर भरण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. नागरिकांना कार्यालयात जाऊन किंवा महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर भेट देऊन ऑनलाईन माध्यमातून मालमत्ताकर भरता येणार आहे.

# परिपत्रकामुळे वाहतूक पोलिसांच्या दंड वसुलीला ब्रेक?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी** : दंड वसुलीत आघाडीवर असलेल्या पिंपरी-चिंचवड वाहतूक विभागाच्या कामगिरीला नव्याने जारी करण्यात आलेल्या परिपत्रकामुळे काही प्रमाणात ब्रेक लागल्याचे चित्र समोर येत आहे. वर्षभर विविध मोहिमा राबवत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या या विभागासमोर आता दंड वसुलीच मोठे आव्हान उभे राहिले असून, त्याचा परिणाम राज्याच्या महसूल उत्पन्नावर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

पिंपरी-चिंचवड वाहतूक पोलिसांनी मागील वर्षभरात तब्बल ३२ कोटी ८४ लाख ९० हजार २७५ रुपयांचा दंड वसूल करत लक्षवेधी कामगिरी नोंदवली होती. हेल्मेट सक्ती, सिग्नल तोडणे, वेगमर्यादा उल्लंघन आणि नो-पार्किंग अशा नियमभंगांवर लक्ष केंद्रित करून विशेष मोहिमा राबवण्यात आल्या. त्यामुळे वाहतूक नियमांचे पालन वाढले आणि महसूल उत्पन्नातही मोठी भर पडली. मात्र, अप्पर महासंचालक (वाहतूक) यांच्या नव्या परिपत्रकानंतर दंड वसुली प्रक्रियेत अडथळे निर्माण होत असल्याचे दिसत आहे. दंड आकारणीची प्रक्रिया तुलनेने जलद होत असली तरी प्रत्यक्ष वसुलीच्या वेळी वाहनचालकांकडून विरोध, शाब्दिक वाद आणि विलंबाच्या घटना वाढत असल्याची माहिती आहे. तात्काळ वसुलीवर आलेल्या मर्यादांमुळे दंडाची रक्कम प्रत्यक्ष जमा होण्यास उशीर लागत आहे.

वाहतूक पोलिस अधिकाऱ्यांच्या मते, रस्त्यावर कारवाई करतानाच मोठा ताण असतो. त्यात वसुलीची प्रक्रिया अधिक गुंतागुंतीची झाल्याने कामकाजावर परिणाम होत आहे. दंड आकारल्यानंतर तो वसूल करताना वाहनचालकांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याने अडचणी वाढल्या आहेत. नव्या नियमांमुळे काही चालकांकडून टाळाटाळ वाढली असून प्रलंबित दंडाची रक्कमही वाढण्याची शक्यता आहे.

या परिपत्रकाला वाहनचालकांकडून मिश्र प्रतिसाद मिळत आहे. काहींना जागेवरच दंड भरावा लागत नसल्याने दिलासा वाटत असला, तरी काहींनी यामुळे नियमांची अंमलबजावणी सैल होण्याची भीती व्यक्त केली आहे. कडक कारवाईमुळेच वाहनचालक नियमांचे पालन करतात, असे मत काही नागरिकांनी नोंदवले आहे.

वाहतूक दंड हा केवळ शिस्त राखण्याचे साधन नसून राज्याच्या महसुलाचा एक महत्त्वाचा स्रोतही मानला जातो. या माध्यमातून मिळणारा निधी पायाभूत सुविधा आणि वाहतूक व्यवस्थेच्या सुधारणांसाठी वापरला जातो. त्यामुळे वसुली मंदावल्यास महसूल घटण्याची आणि त्याचा दीर्घकालीन परिणाम विकासकामांवर होण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. पिंपरी-चिंचवड वाहतूक विभागाने ई-चलन प्रणाली, डिजिटल पेमेंट आणि विशेष तपासणी मोहिमांच्या माध्यमातून यापूर्वी मोठ्या प्रमाणात दंड वसुली केली होती. मात्र, नव्या परिपत्रकामुळे प्रत्यक्ष वसुलीचा वेग कमी झाल्याने या मोहिमांच्या परिणामकारकतेवरही मर्यादा येत असल्याचे दिसत आहे.

## जागतिक महिला दिनाचा कार्यक्रम उत्साहात

# महिला बचत गटांच्या कार्याचा पालिकेकडून गौरव

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी** : पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने शहरातील उत्कृष्ट महिला बचत गटांचा विशेष सन्मान करण्यात आला. जागतिक महिला दिनानिमित्त समाज विकास विभागाच्या वतीने चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात आयोजित कार्यक्रम उत्साहात पार पडला.

या वेळी बोलताना उपमहापौर शर्मिला बाबर यांनी महिलांचे समाजातील योगदान अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगितले. एक महिला सक्षम झाली की ती संपूर्ण कुटुंबाला सक्षम करते. त्यामुळे प्रत्येक महिला स्वावलंबी आणि सक्षम व्हावी, यासाठी विविध उपक्रम राबविणे आवश्यक असून महापालिकेचा समाज विकास विभाग त्या दृष्टीने सक्षमपणे काम करत असल्याचे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमाचे उद्घाटन उपमहापौर शर्मिला बाबर यांच्या हस्ते झाले. या वेळी माजी आमदार अश्विनी जगताप, विधी समिती सभापती सुजाता बोराटे, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती राणी पठारे, डॉ. श्रद्धा रवि लांडगे आणि प्रिया आण्णा बनसोडे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाला नगरसदस्या माई काटे, नीता पाडाळे, कुंदा भिसे, अनिता काटे, प्रतीक्षा लांघी जवळकर, पल्लवी जगताप, रेश्मा भुजबळ, सुलभा उबाळे, सुप्रिया चांदगुडे, रिटा सानप, सारिका बोऱ्हाडे, शिवानी नरळे, प्रियांका कुदळे, योगिता बारणे, निकिता कदम, सारिका मासुळकर, सोनम मोरे, मनीषा लांडे, पल्लवी वाळके, श्रुती वाकडकर, वर्षा जगताप, पल्लवी वाल्हेकर, श्रुती डोळस, वैशाली काळभोर तसेच माजी नगरसदस्या उषा मुंढे, उपायुक्त ममता शिंदे, चेतना केरूरे, सहाय्यक आयुक्त निवेदिता घार्गे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह विविध विभागांतील महिला अधिकारी, कर्मचारी आणि महिला बचत गटातील सदस्य उपस्थित होत्या.

माजी आमदार अश्विनी जगताप यांनी महिलांचा विकास झाला तरच समाजाचा विकास शक्य असल्याचे सांगितले. प्रत्येक महिलेने स्वतःच्या पायावर उभे राहून सक्षम व्हावे, असे आवाहन करत 'निरोगी रहा, आनंदी रहा, हसत रहा' असा संदेशही त्यांनी उपस्थित महिलांना दिला.

शहरातील बसस्थानके, बाजारपेठा, मंडई, मार्केट तसेच गर्दीच्या ठिकाणी महिला आणि दिव्यांगांसाठी सर्व सुविधायुक्त आधुनिक स्वच्छतागृहे उभारण्याचे नियोजन करण्यात येत असल्याची माहिती महिला व बालकल्याण समितीच्या सभापती राणी पठारे यांनी दिली. महिलांना स्वतंत्र स्वच्छतागृह नसल्यामुळे होणारी गैरसोय आणि त्याचा आरोग्यावर होणारा परिणाम लक्षात घेऊन हा उपक्रम लवकरच राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे उभारणारी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका राज्यातील पहिली महानगरपालिका ठरणार असल्याचा दावाही त्यांनी केला.

# फुले दांपत्य सृष्टी प्रकल्प लवकर पूर्ण करा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी** : पिंपरी-चिंचवड शहरात उभारण्यात येत असलेल्या 'क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सृष्टी' या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे काम शक्य तितक्या लवकर पूर्ण करावे. यासाठी महापालिकेच्या स्थापत्य, विद्युत, उद्यान आणि संबंधित सर्व विभागांनी परस्पर समन्वय साधून काम करावे, असे निर्देश महापौर रवि लांडगे यांनी दिले.

येथील प्रकल्प स्थळी प्रत्यक्ष भेट देऊन महापौरांनी कामाचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी सुरू असलेल्या कामांची पाहणी करत त्यांनी संबंधितांना प्रकल्पाच्या प्रगतीची माहिती घेतली. या वेळी नगरसदस्या अनुराधा गोरखे, सुप्रिया चांदगुडे, नगरसदस्य तुषार हिंगे, कुशाग्र कदम, माजी नगरसदस्य मारुती भापकर, सामाजिक कार्यकर्ते विशाल जाधव, शंकर लोंढे, प्रल्हाद कांबळे, आनंदा कुदळे, ॲड. विद्या शिंदे, कविता खराडे यांच्यासह क्षेत्रीय अधिकारी निवेदिता घार्गे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, कार्यकारी अभियंता वैशाली ननावरे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच इतर अधिकारी उपस्थित होते. महापौरांनी शिल्प आणि पुतळ्यांची उभारणी, अत्याधुनिक एलईडी स्क्रीन, प्रकाश व्यवस्था, आकर्षक बाग तसेच नक्षीकाम अशा विविध घटकांची पाहणी केली.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### पाच गाड्या एकमेकांवर धडकल्या

**पिंपरी** : मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर बुधवारी सकाळी झालेल्या भीषण अपघाताने पुन्हा एकदा या महत्त्वाच्या मार्गावरील सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. सकाळी सुमारे ९.४० वाजण्याच्या सुमारास खोपोलीजवळ नव्याने सुरू झालेल्या बोगद्याच्या बाहेर पडण्याच्या ठिकाणी पाच वाहनांची साखळी धडक झाली. या दुर्घटनेत तिघांचा जागीच मृत्यू झाला, तर तीन ते चार जण किरकोळ जखमी झाल्याची प्राथमिक माहिती आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पुण्याहून मुंबईकडे जाणाऱ्या मार्गावर एक कंटेनर भरधाव वेगाने येत होता. उताराचा रस्ता, वळण आणि वेग यांचा घातक संगम झाल्याने चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. पुढे असलेल्या वाहनांना जोरदार धडक देत कंटेनर पुढे घसरत गेला. काही क्षणांतच परिस्थिती गंभीर बनली आणि एक इनोव्हा गाडीवर कंटेनर पलटला. या गाडीत असलेल्या तिघांचा जागीच मृत्यू झाला. अपघाताची तीव्रता इतकी भीषण होती की, बचाव पथक घटनास्थळी पोहोचेपर्यंत मोठे नुकसान झाले होते.

### हिवडी प्रकरणी तीन संशयित ताब्यात

**शिरूर** : दहिवडी(ता.शिरूर) परिसरातील मांजरेवस्ती येथे १२ वर्षीय मुलाच्या संशयास्पद मृत्यूने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली असून,या प्रकरणाचा तपास पोलिसांकडून अतिशय कसून आणि गोपनीय पद्धतीने सुरू आहे. दरम्यान,या प्रकरणी तीन संशयितांना ताब्यात घेण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. साईराज गणेश मांजरे या लहानग्याचा मृत्यू मंगळवारी सायंकाळी उघडकीस आला. विशेष म्हणजे, याच ठिकाणी यापूर्वी २१ जून २०२४ रोजी यश शरद गायकवाड (वय ११) या मुलाचाही मृतदेह आढळून आला होता.दोन्ही घटनांमध्ये आढळणारे साम्य लक्षवेधी ठरत असून,त्यामुळे या प्रकरणाचे गूढ अधिकच गडद झाले आहे. फॉरेन्सिक तपासणी आणि शवविच्छेदन अहवालानुसार,दोन्ही मृतदेहांवर डोक्यावर व पोटावर खोल जखमा आढळून आल्या आहेत. त्यामुळे या मृत्यूमागे नेमके कारण काय,याबाबत तर्क-वितर्कांना उधाण आले आहे. दरम्यान,पोलिसांनी या सर्व बाबींचा बारकाईने तपास सुरू केला आहे.

## अध्यक्षपदी वीरधवल जगदाळे; उपाध्यक्षपदासाठी विवेक वळसे पाटील

# जिल्हा परिषदेवर राष्ट्रवादी काँग्रेसचे वर्चस्व

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे** : पुणे जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेसचे दौंड तालुक्यातील ज्येष्ठ सदस्य वीरधवल जगदाळे, तर आंबेगाव तालुक्यातील विवेक वळसे पाटील यांची उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. जिल्हा परिषदेत जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी सर्वसाधारण सभा बोलावण्यात आली होती.

तब्बल चार वर्षांच्या प्रतीक्षेनंतर पुणे जिल्हा परिषदेला अखेर अध्यक्ष आणि उपाध्यक्ष मिळाले आहेत.

उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या वेळेत राष्ट्रवादी काँग्रेसकडून अध्यक्षपदासाठी वीरधवल जगदाळे, तर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे गटनेते ॲड. विजयसिंह शिंदे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. उपाध्यक्षपदासाठी राष्ट्रवादी काँग्रेसकडून विवेक वळसे पाटील, तर शिवसेना (शिंदे गट) चे मंगेश काकडे यांनी अर्ज दाखल केला. दुपारी तीन वाजता झालेल्या सर्वसाधारण सभेच्या कामकाजाच्या सुरुवातीपूर्वी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर दाखल उमेदवारी अर्जांची छाननी करण्यात आली असून सर्व अर्ज वैध ठरले. यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी निवडणूक प्रक्रियेची माहिती देत उमेदवारी अर्ज माघारी घेण्यासाठी १५ मिनिटांचा अवधी जाहीर केला. यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) तसेच शिवसेना (शिंदे गट) सदस्यांमध्ये चर्चा झाली. या चर्चेनंतर विरोधी पक्षाचे विजयसिंह शिंदे आणि मंगेश काकडे यांनी आपले उमेदवारी अर्ज माघारी घेतले. त्यानंतर अध्यक्षपदासाठी वीरधवल जगदाळे आणि उपाध्यक्षपदासाठी विवेक वळसे पाटील यांची बिनविरोध निवड झाल्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी जाहीर केले.

जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद पुढील अडीच वर्षांसाठी सर्वसाधारण गटासाठी आरक्षित आहे. त्यामुळे पक्षातील अनुभवी आणि ज्येष्ठ सदस्यांना संधी मिळणार की नव्या चेहऱ्याला संधी दिली जाणार, याबाबत मोठी उत्सुकता निर्माण झाली होती. बुधवारी सकाळी शिवाजीनगर येथील राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यालयात झालेल्या बैठकीत अध्यक्षपदासाठी वीरधवल जगदाळे, तर उपाध्यक्षपदासाठी विवेक वळसे पाटील यांची नावे निश्चित करण्यात आली.

दौंड तालुक्यातील खडकी-देऊळगाव गटातून विजयी झालेले वीरधवल जगदाळे यांचे नाव अध्यक्षपदासाठी निश्चित होताच दौंड शहरात कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला. फटाके वाजवत आनंद व्यक्त करण्यात आला. वीरधवल जगदाळे हे अजित पवार यांचे विश्वासू सहकारी मानले जातात. ते सलग तीन वेळा जिल्हा परिषदेवर निवडून आल्याने त्यांना प्रशासकीय कामाचा चांगला अनुभव आहे. राष्ट्रवादीच्या नेत्यांच्या मते, पवार कुटुंबीयांशी असलेले त्यांचे जवळचे संबंध आणि स्थानिक पातळीवरील प्रभावी नेतृत्व यामुळेच त्यांच्या नावावर अंतिम शिक्कामोर्तब करण्यात आले. दौंड तालुक्याला जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदाचा मान दुसऱ्यांदा मिळत आहे.

## आळंदीत डीजेमुक्त मिरवणुकांवर भर; शांतता कमेटी बैठकीत आवाहन



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळंदी** : आळंदी पंचक्रोशीत ध्वनी प्रदूषण रोखण्यासाठी सर्व मिरवणुका आणि उत्सव डीजेमुक्त व्हावेत, अशी भूमिका शांतता कमेटीच्या बैठकीत मांडण्यात आली. याबाबत अंतिम निर्णयासाठी लवकरच सर्वसमावेशक संयुक्त बैठक घेण्यात येणार आहे.

आळंदी पोलीस ठाण्यात वरिष्ठ पोलीस निरीक्षक भीमा नरके यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली. यावेळी नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, शांतता कमेटीचे सदस्य, माजी नगरसेवक तसेच विविध समाजघटकांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

गुढीपाडवा, रमजान ईद, हनुमान जयंती, भगवान महावीर जयंती, रामनवमी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती या पार्श्वभूमीवर मिरवणुका, कायदा-सुव्यवस्था, पोलीस बंदोबस्त आणि मार्ग यावर चर्चा झाली.

यावेळी आळंदीत अनेक मिरवणुका यापूर्वीही डीजेमुक्त झाल्याचा उल्लेख करण्यात आला. ध्वनी प्रदूषण कमी करण्यासाठी संयोजकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन शांतता कमेटीतर्फे करण्यात आले. रात्री उशिरापर्यंत चालणाऱ्या मिरवणुकांवर नियंत्रण ठेवण्यात येत असून, त्या वेळेत आणि शांततेत पार पडाव्यात, यावरही बैठकीत भर देण्यात आला.

## आळंदीत श्री रामजन्मोत्सवाचे आयोजन



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळंदी** : येथील आवेकर भावे रामचंद्र संस्थान (ट्रस्ट) तर्फे प्रथा परंपरांचे पालन करीत श्री राम नवमी आळंदीत श्री रामनवमी निमित्त श्री रामजन्मोत्सवाचे आयोजन निमित्त वर्षोकोत्सवात श्री रामजन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या निमित्त गुढी पाडवा ते श्री राम नवमी गुरुवार (दि. १९) ते गुरुवार (दि. २६) या कालावधीत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. भाविक, नागरिकांनी या सोहळ्यास उपस्थित राहावे असे आवाहन आवेकर भावे रामचंद्र संस्थान (ट्रस्ट) तर्फे करण्यात आले आहे.

या वर्षीचा सोहळा हा आता १८६ व्या वर्षात प्रवेश करत आहे, ज्या मध्ये श्री राम मंदिरात संगीत, नृत्य, भजन, नारदीय कीर्तन आणि इतर पारंपारिक कार्यक्रमांचा समावेश आहे. कार्यक्रमात १९ मार्च ते २६ मार्च २०२६ पर्यंत विविध सांस्कृतिक कार्यक्रम आणि धार्मिक सोहळे दररोज आयोजित केले जातील.

कार्यक्रमांत रुद्र-अभिषेक, नारदीय कीर्तन, भरतनाट्यम, भजन, रामलीला, संकीर्तन, भक्ति संगीत, आळंदीकर ग्रामस्थ गावकरी भजन सेवा आदींचा समावेश आहे.

कार्यक्रमाचा समारोप २६ मार्च २०२६ रोजी श्री राम जन्म कीर्तन आणि श्रींची पालखी नगरप्रदक्षिणा मिरवणुकीने होईल. हा उत्सव भक्तांमध्ये आध्यात्मिक विकास आणि सांस्कृतिक समृद्धी वाढविण्याचे उद्दिष्ट काय ठेवत आहे. संस्थानचे वतीने भाविक, नागरिकांना उत्सवात सहभागी होण्यासाठी आवाहन पंच मंडळाने केले आहे.

# आंबेगावच्या पूर्व भागातील ओढे-नाले कोरडे

## मांदळेवाडी, वडगावपीर, लोणी, धामणी, पहाडदरा, शिरदाळे गावांवर पाणीटंचाईचे संकट

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**लोणी-धामणी** : आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील मांदळेवाडी, वडगावपीर, लोणी, धामणी, पहाडदरा आणि शिरदाळे या गावांवर पुन्हा एकदा पाणीटंचाईचे गंभीर संकट ओढवले आहे.

दरवर्षी मार्च ते जून या चार महिन्यांच्या कालावधीत या गावांतील नागरिकांना तीव्र पाणीअभावाला सामोरे जावे लागते. यंदाही उन्हाळ्याची चाहूल लागताच परिसरातील ओढे, नाले आटून कोरडे पडले असून विहिरी आणि विंधन विहिरींची पाणीपातळी मोठ्या प्रमाणात खालावली आहे.

या गावांमध्ये सार्वजनिक पाणीपुरवठा योजना तसेच जलजीवन मिशनअंतर्गत कोट्यवधी रुपयांची कामे हाती घेण्यात आली. काही ठिकाणी ही कामे पूर्ण झाली, तर काही ठिकाणी अद्याप अपूर्णच आहेत. काही गावांत योजना सुरू होण्यापूर्वीच बंद पडल्याची स्थिती आहे. त्यामुळे मोठा निधी खर्चूनही नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करावी लागत असल्याची खंत ग्रामस्थ व्यक्त करत आहेत. शेतीच्या पाण्याचा प्रश्न तर वेगळाच असून, पिकांनाही पाण्याअभावी फटका बसू लागला आहे.

सध्या परिसरातील बहुतांश ओढे-नाले पूर्णपणे कोरडे ठणठणीत पडले आहेत. विहिरी आणि बोअरवेलमधील पाणी खोलवर गेल्याने केवळ पिण्याचेच नव्हे, तर शेतीसाठीच्या पाण्याचाही प्रश्न गंभीर बनला आहे. उन्हाळ्याची तीव्रता वाढत गेल्यास परिस्थिती आणखी बिकट होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

भविष्यातील संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन वडगावपीर आणि पहाडदरा ग्रामपंचायतींनी टँकर सुरू करण्याबाबतचे प्रस्ताव पंचायत समितीकडे सादर केले आहेत. तर इतर काही ग्रामपंचायतींकडूनही पाणीपुरवठ्यासंदर्भातील प्रस्ताव तयार करण्याचे काम सुरू असून, पुढील दोन दिवसांत ते पंचायत समितीकडे सादर केले जाणार असल्याची माहिती मिळत आहे.

या भागातील नागरिकांना गेली अनेक वर्षे उन्हाळ्यातील चार महिने पिण्याच्या पाण्यासाठी मोठी धावपळ करावी लागते. मात्र, या प्रश्नावर दीर्घकालीन आणि ठोस उपाययोजना करण्यात प्रशासन अपयशी ठरत असल्याची भावना ग्रामस्थांमध्ये आहे. अनेक योजना मंजूर झाल्या, काही अर्धवट राहिल्या, तर काही बंद पडल्या; मात्र त्याची जबाबदारी निश्चित करण्यासाठी ना शासन पातळीवर, ना तालुका स्तरावर ठोस चौकशी झाल्याचे दिसत नाही. परिणामी, या दुष्काळग्रस्त गावांतील नागरिकांना वर्षानुवर्षे त्याच समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

उन्हाळा तीव्र होत असताना पूर्व भागातील पाणीप्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, तातडीच्या टँकरपुरवठ्यासोबतच दीर्घकालीन जलव्यवस्थापनासाठी सक्षम पावले उचलण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

# एलपीजी टंचाईचा मंगल कार्यालयांना फटका

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**भवानीनगर** : आखाती देशांतील युद्धाच्या पार्श्वभूमीवर व्यावसायिक गॅस सिलेंडरची टंचाई निर्माण झाली असून त्याचा मोठा फटका मंगल कार्यालये आणि केटरिंग व्यवसायाला बसत आहे. त्यामुळे ग्राहकांना सेवा कशी द्यायची, असा प्रश्न मंगल कार्यालय चालकांसमोर उभा राहिला आहे. ही माहिती इम्पेरियल बँक्वेट्स आणि मुक्ताई लॉन्सचे नितीन मोरे व अनिल निंबाळकर यांनी दिली.

याबाबत अधिक माहिती देताना मोरे व निंबाळकर म्हणाले की, आखाती देशांतील युद्धामुळे गॅस कंपन्यांकडून व्यावसायिक गॅस सिलेंडरचा पुरवठा अत्यंत मर्यादित झाला आहे. परिणामी, केटरिंग व्यवसायासाठी आवश्यक असलेला गॅस मिळणे कठीण झाले असून अनेक ठिकाणी पुरवठाच नाकारला जात आहे. केटरिंगचा संपूर्ण व्यवसाय कमर्शियल गॅस सिलेंडरवर अवलंबून असल्याने आधीच घेतलेली लग्न समारंभांची बुकिंग पूर्ण करणे मोठे आव्हान ठरत आहे.

काही खासगी वितरकांकडून व्यावसायिक गॅस सिलेंडर दुप्पट दराने उपलब्ध करून दिले जात आहेत. मात्र, तेही मर्यादित प्रमाणात आणि उपलब्धतेनुसारच दिले जात असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे वाढीव दरांचा थेट परिणाम व्यवसायावर होत आहे.

दुसरीकडे, गॅसच्या वाढीव खर्चाबाबत ग्राहक सहकार्य करण्यास तयार नसल्याने अडचण आणखी वाढली आहे.


गॅस टंचाईमुळे ज्यांचे लग्नसमारंभाचे बुकिंग घेण्यात आले आहे, त्यांना कार्यक्रम पुढे ढकलण्याची विनंती करावी लागत आहे. मात्र, अनेक ग्राहकांनी नियोजन ठरल्याप्रमाणेच सेवा देण्याची मागणी केली असून गॅस टंचाईचा प्रश्न तुम्हीच सोडवा, अशी भूमिका घेतली आहे. त्यामुळे मंगल कार्यालय चालक आणि केटरिंग व्यावसायिकांवर मोठा ताण निर्माण झाला आहे.

मागील आठ दिवसांपासून केटरिंग व्यावसायिक गॅस टंचाईचा सामना करत आहेत. १५ एप्रिलपर्यंत लग्नसराईच्या तारखा मोठ्या प्रमाणात बुक झालेल्या असल्याने या काळात सेवा सुरळीत ठेवणे हे मोठे आव्हान आहे. पुढील महिन्यांत मुहूर्त कमी असल्याने या समस्येवर उपाय शोधण्यासाठी काहीसा अवधी मिळू शकतो. मात्र, सध्याची परिस्थिती अत्यंत कठीण आणि त्रासदायक असल्याचे व्यावसायिकांनी सांगितले.

मंगल कार्यालयांतील स्वयंपाक व्यवस्था पूर्णपणे गॅसवर आधारित असल्याने संपूर्ण व्यवसायच अधांतरी आला आहे. सर्व मंगल कार्यालय चालक आणि केटरिंग व्यावसायिक गॅस टंचाईमुळे हैराण झाले असून या समस्येवर तातडीने तोडगा निघणे गरजेचे असल्याची मागणी करण्यात येत आहे.

# श्री छत्रपतीच्या संचालकांची श्री दत्तला भेट

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**भवानीनगर** : येथील श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याने कार्यक्षेत्रात ऊसाची उपलब्धता वाढावी आणि उच्च साखर उतारा देणाऱ्या ऊस वाणांच्या लागवडीत वाढ व्हावी, या उद्देशाने ऊस विकास कार्यक्रम हाती घेतला आहे. त्याअंतर्गत कारखान्याचे संचालक मंडळ व अधिकारी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणाऱ्या साखर कारखान्यांना भेट देऊन माहिती घेत आहेत. याच अनुषंगाने कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ येथील श्री दत्त शेतकरी सहकारी साखर कारखान्यास नुकतीच भेट देण्यात आली.

श्री दत्त शेतकरी सहकारी साखर कारखान्याने कार्यक्षेत्रातील क्षारपड जमिनी सुधारण्यासाठी कृत्रिम सच्छिद्र निचरा प्रणाली आणि बंदिस्त मुख्य पाइपलाइन या तंत्रांचा वापर करून विशेष प्रकल्प राबविला आहे. त्याअंतर्गत कवठे गुलंद व गौरवाड येथील प्रकल्पांना भेट देऊन श्री छत्रपती कारखान्याच्या संचालक मंडळाने सविस्तर माहिती घेतली. तसेच, सेंद्रिय ऊस शेतीचे तंत्रज्ञान विकसित करून शेतीतील वाढता खर्च कमी करणे, जमिनीचा पोत चांगला राखणे आणि सेंद्रिय कर्ब वाढवून ऊस उत्पादनात वाढ करणे, या दृष्टीने राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचीही माहिती घेण्यात आली. पाने व पाणी परीक्षण, सुपर केन नर्सरी तंत्रज्ञान, देशी वाण बीज बँक तसेच प्रोजेक्टरच्या माध्यमातून कारखान्यातर्फे राबविण्यात येणाऱ्या योजनांचे सादरीकरणही करण्यात आले. या वेळी श्री दत्त कारखान्याचे अध्यक्ष रघुनाथराव पाटील, संचालक गणपतराव पाटील, कार्यकारी संचालक एम. व्ही. पाटील तसेच इतर अधिकाऱ्यांनी मार्गदर्शन केले.

या अभ्यास दौऱ्यात श्री छत्रपती कारखान्याचे उपाध्यक्ष कैलास गावडे, संचालक पृथ्वीराज घोलप, गणपतराव कदम, निलेश टिळेकर, संतोष मासाळ,सतीश देवकाते,सुचिता सपकळ तसेच कारखान्याचे अधिकारी सहभागी झाले होते. श्री दत्त साखर कारखान्याने हाती घेतलेले उपक्रम स्तुत्य असून, त्याप्रमाणेच श्री छत्रपती कारखान्यातही असे उपक्रम राबविण्याचा विचार केला जाईल, असे कारखान्याचे अध्यक्ष पृथ्वीराज जाचक आणि उपाध्यक्ष कैलास गावडे यांनी स्पष्ट केले.

## चाकणच्या घटनेनंतर संपूर्ण भागात भीतीचे सावट

# राजगुरुनगर-खेड परिसरात भटक्या श्वानांचा प्रश्न गंभीर

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**राजगुरुनगर** : चाकण येथे भटक्या कुत्र्यांच्या झुंडीने एका बत्तीस वर्षीय महिलेवर हल्ला करून तिचा मृत्यू घडवून आणल्याच्या धक्कादायक घटनेनंतर संपूर्ण खेड तालुक्यासह राजगुरुनगर शहर आणि ग्रामीण भागातही भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. ही घटना केवळ चाकणपुरती मर्यादित नसून, भटक्या श्वानांचा वाढता उपद्रव आता संपूर्ण परिसरासाठी धोक्याची घंटा ठरत असल्याची भावना नागरिकांत व्यक्त होत आहे.

पुणे-नाशिक महामार्गालगतच्या सेवा रस्त्यावर सोमवारी पहाटे सुमारे दोनच्या सुमारास कामावरून घरी परतणाऱ्या बत्तीस वर्षीय महिलेवर सहा भटक्या कुत्र्यांच्या झुंडीने हल्ला केला. या हल्ल्यात तिचा जागीच मृत्यू झाला. या घटनेनंतर चाकण नगरपरिषदेवर निष्क्रियतेचे आरोप होत असून, भटक्या श्वानांच्या नियंत्रणासाठी तातडीच्या उपाययोजना जाहीर करण्यात आल्या आहेत.

राजगुरुनगर शहर, उपनगर आणि ग्रामीण भागातही अशीच परिस्थिती निर्माण होत असल्याची तक्रार नागरिकांकडून होत आहे. कचऱ्याचे ढीग, रस्त्याकडेला उघड्यावर टाकला जाणारा अन्नकचरा, अनियंत्रित प्रजनन आणि स्थानिक संस्थांची अपुरी कारवाई यामुळे भटक्या श्वानांच्या झुंडी वाढत आहेत. विशेषतः औद्योगिक पट्ट्यात काम करून रात्री उशिरा परतणारे कामगार, महिला, लहान मुले आणि वृद्ध नागरिक यांच्यासमोर मोठा धोका उभा राहिला आहे.

चाकणमधील हल्ल्याची पद्धत अत्यंत हिंस्र असल्याने काही स्तरांत 'वुल्फ डॉग' अर्थात लांडगा-कुत्रा संकरित प्राण्यांविषयी संशय व्यक्त केला जात आहे. मात्र, उपलब्ध विश्वसनीय स्रोतांमध्ये या विशिष्ट चाकण घटनेतील प्राणी संकरित होते, याची अधिकृत पुष्टी अद्याप आढळत नाही.

दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने भटक्या कुत्र्यांच्या प्रश्नावर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या जबाबदारीबाबत कडक निरीक्षणे नोंदवली आहेत. ऑगस्ट २०२५ मधील एका आदेशात न्यायालयाने रस्ते आणि सार्वजनिक ठिकाणांवरील धोका कमी करण्यासाठी स्थानिक संस्थांनी आश्रयस्थाने, पकड मोहीम, निर्बीजीकरण, लसीकरण आणि नोंदवही व्यवस्था काटेकोरपणे उभारण्याची गरज अधोरेखित केली. तसेच पकडलेल्या कुत्र्यांना पुन्हा रस्त्यावर सोडण्याबाबतही न्यायालयाने गंभीर आक्षेप नोंदवले आहेत.

चाकण नगरपरिषदेने या घटनेनंतर श्वाननियंत्रणासाठी आश्रयक्षमता शंभरवरून दोनशेपर्यंत वाढवण्याची, मोठ्या प्रमाणावर लसीकरण व निर्बीजीकरण मोहीम राबवण्याची, मांसकचऱ्याची विल्हेवाट काटेकोर करण्याची आणि कचरा साठवण बिंदूंवर देखरेख वाढवण्याची घोषणा केली आहे. या उपायांसाठी किमान पन्नास लाख रुपयांची गरज भासणार असल्याचेही प्रशासनाने म्हटले आहे.

याच पार्श्वभूमीवर राजगुरुनगर नगरपरिषदेकडूनही शहर परिसरात भटक्या श्वानांचे निर्बीजीकरण आणि लसीकरण मोहीम राबवण्याची तयारी सुरू असल्याचे सांगितले जात आहे. शस्त्रक्रियेनंतर त्यांना ठेवण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था उभारली जाणार असून त्यासाठी ठेकेदार नियुक्तीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्याची माहिती मुख्याधिकारी अंबादास गरकळ यांनी दिली आहे.

## श्री शिवाजी विद्यालयात माजी विद्यार्थी संघाची स्थापना

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी** : आंबेगाव तालुक्यातील धामणी येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री शिवाजी विद्यालय व ज्युनिअर कॉलेजमध्ये माजी विद्यार्थी संघाची स्थापना करण्यात आली.संघाच्या अध्यक्षपदी डॉ. अशोककुमार पगारिया यांची निवड करण्यात आली असून उपाध्यक्षपदी अंकुश भुमकर आणि भगवान वाघ यांची निवड झाली आहे. तसेच खजिनदारपदी संदीप निवृत्ती बोराडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

विद्यालयाच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या सर्व माजी विद्यार्थ्यांचा मेळावा नुकताच विद्यालयात आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यासाठी मोठ्या संख्येने माजी विद्यार्थी उपस्थित होते. रयत शिक्षण संस्थेच्या ध्येयधोरणानुसार आणि शासनाच्या परिपत्रकानुसार माजी विद्यार्थी संघाची स्थापना करण्यात आली. सदस्य म्हणून ज्ञानेश्वर नानाभाऊ विधाटे, रामदास म्हातारबा जाधव, रेश्मा अजित बोऱ्हाडे, आदिनाथ माधवराव जाधव, विलासजी नेनसुख पगारिया, शांताराम गेणभाऊ जाधव, डॉ. राजेंद्र नामदेव वाकचौरे, देवानंद दत्तात्रय जाधव, श्रीराम बळवंत विधाटे, दादाभाऊ मारुती गाढवे, बाबासाहेब शिवराम बढेकर, मयूर संभाजी सरडे, वामनराव धोंडीबा जाधव, दत्तात्रय भोजणे यांची निवड करण्यात आली.

## सारांश वृत्त

### पंजाबमध्ये हँड ग्रेनेडसह दोघांना अटक

**चंदीगड :** पंजाब पोलिसांनी बुधवारी बठिंडा येथे दोन जणांना अटक करून आणि दोन हँड ग्रेनेड जप्त करून एक मोठा दहशतवादी धोका टाळल्याचा दावा केला आहे. बुटा सिंग उर्फ गुरप्रीत सिंग उर्फ गोपू, फिरोजपूरचा रहिवासी आणि मोगा येथील रहिवासी हरमंदर सिंग उर्फ निक्का अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. जप्त केलेले बॉम्ब हे सीमापार घटकांशी संबंधित असलेल्या एका अवैध पुरवठा साखळीचा भाग होते.

### गारो हिल्समध्ये संचारबंदी वाढवली

**तुरा :** मेघालयाच्या पश्चिम गारो हिल्स जिल्ह्यातील संचारबंदी आणखी एका दिवसासाठी वाढवण्यात आली असून, हिंसाचाराची पुढील वाढ रोखण्यासाठी सार्वजनिक सभा, मोर्चे आणि बेकायदेशीर जमावांवर बंदी घालणारे प्रतिबंधात्मक आदेशही लागू करण्यात आले आहेत, असे अधिकाऱ्यांनी बुधवारी सांगितले. जिल्हाधिकारी आणि उपायुक्त विभोर अग्रवाल यांनी जारी केलेल्या आदेशानुसार, सामान्य कामकाज सुरळीत चालावे यासाठी गुरुवारी सकाळी ६ ते सायंकाळी ६ या वेळेत १२ तासांची शिथिलता देऊन, १९ मार्च रोजी सकाळी ६ ते २० मार्च रोजी सकाळी ६ पर्यंत संचारबंदी लागू राहील.

### राजस्थानकडून पंजाब थकबाकी वसूल करणार

**चंदीगड :** १९२० च्या त्रिपक्षीय कराराचा संदर्भ देत मुख्यमंत्री भगवंत मान यांनी बुधवारी सांगितले की, पंजाब सरकार १९६० पासूनच्या 'थकबाकी' पाणी वापरापोटी राजस्थानकडून १.४४ लाख कोटी रुपयांची मागणी करणार आहे. मान म्हणाले की, राजस्थान १९६० पर्यंत पाण्यासाठी पंजाबला रॉयल्टी देत असे, पण त्यानंतर ते थांबवले. मुख्यमंत्री भगवंत मान यांनी ठामपणे सांगितले की, राजस्थानने एकतर पंजाब सरकारची देय रक्कम द्यावी किंवा पाण्याचा करण्यात येत असलेला उपसा थांबवावा, तसेच या व्यवस्थेचे नियमन करणाऱ्या १९२० च्या कराराचा फेरविचार करण्याची मागणीही मान यांनी केली.

### इराणचा प्रतिहल्ला, बेरूतवर हल्ले, तेलबाजार हादरला

# मध्य पूर्वेतील युद्ध भडकले

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली/तेहरान :** मध्य पूर्वेत सुरू असलेला संघर्ष आता तिसऱ्या आठवड्यात पोहोचला असून परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे. इराण, इस्रायल आणि अमेरिकेतील वाढत्या लष्करी कारवाईमुळे संपूर्ण पश्चिम आशियात अस्थिरतेचे वातावरण निर्माण झाले आहे. १८ मार्चपर्यंतच्या घडामोडींनुसार, इराणने इस्रायलवर क्षेपणास्त्रांचा मारा केला, लेबनॉनची राजधानी बेरूतवर इस्रायलकडून पुन्हा हल्ले झाले, तर होर्मुझ सामुद्रधुनीभोवतीचा तणाव जागतिक तेलबाजारावरही परिणाम करत आहे.

या संघर्षात इराणमध्ये किमान १,३०० जण, लेबनॉनमध्ये ८८० हून अधिक आणि इस्रायलमध्ये १२ जणांचा मृत्यू झाला आहे. अमेरिकेच्या लष्करातील १३ जवान ठार तर सुमारे २०० जखमी झाल्याचीही नोंद आहे. या संघर्षाची सुरुवात २८ फेब्रुवारी रोजी अमेरिकन-इस्रायली हल्ल्यांपासून झाली असून त्यानंतर हा लढा संपूर्ण प्रदेशात पसरला आहे.

इराणच्या सर्वोच्च राष्ट्रीय सुरक्षा परिषदेचे प्रमुख अली लारीजानी यांच्या हत्येनंतर तणाव आणखी वाढला आहे. इराणने त्यांच्या मृत्यूची अधिकृत पुष्टी केली असून, त्यानंतर इस्रायलविरोधात प्रतिशोध घेण्याची घोषणा केली आहे. बुधवारी इराणकडून करण्यात आलेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यात तेल अवीवजवळ दोन जणांचा मृत्यू झाल्याचे वृत्त आहे. इराणी लष्कराने लारीजानी यांच्या हत्येचा "निर्णायक आणि पश्चात्तापजनक" बदला घेतला जाईल, असा इशाराही दिला आहे.

दरम्यान, लेबनॉनची राजधानी बेरूतवर इस्रायलने पुन्हा हल्ले चढवले. १८ मार्चच्या पहाटे मध्य बेरूतमधील दाट लोकवस्तीच्या भागावर पूर्वसूचना न देता करण्यात आलेल्या हल्ल्यात किमान सहा जण ठार झाल्याची माहिती आहे. त्यानंतरही मध्य बेरूतमध्ये आणखी एक हल्ला झाल्याचे वृत्त आहे. लेबनॉनमधील हिज्बुल्ला गटाच्या कारवायांनंतर इस्रायलने दक्षिण लेबनॉनसह विविध भागांत कारवाया तीव्र केल्या आहेत. या संघर्षाचा परिणाम खाडी देशांवरही दिसून आला. कतारने आपल्या हवाई हद्दीकडे लक्ष्य केलेल्या क्षेपणास्त्र हल्ल्याला अडविल्याचा दावा केला आहे, तर सौदी अरेबियाने प्रिन्स सुलतान एअर बेस परिसरावर डागण्यात आलेले बॅलेस्टिक क्षेपणास्त्र पाडल्याचे सांगितले. बगदादमधील अमेरिकन दूतावासालाही ड्रोन आणि रॉकेट हल्ल्याचा फटका बसल्याचे वृत्त आहे.

होर्मुझ सामुद्रधुनीभोवतीचा तणाव हा जागतिक अर्थव्यवस्थेसाठीही धोक्याची घंटा मानला जात आहे. आंतरराष्ट्रीय सागरी संघटनेची विशेष बैठक बोलावण्यात आली असून अडकलेल्या जहाजे आणि खलाशांसाठी 'सुरक्षित सागरी मार्ग' तयार करण्याचा विचार सुरू आहे.

तेलबाजारातही मोठी हालचाल दिसून आली. अमेरिकन बेंचमार्क डब्ल्यूटीआय क्रूड १८ मार्च रोजी आशियाई व्यवहारात ४ टक्क्यांहून अधिक घसरून प्रति बॅरल ९२.११ डॉलरवर आला, तर ब्रेंट क्रूड १००.५० डॉलरपर्यंत खाली आला. इराणने याचदरम्यान इस्रायलसाठी हेरगिरी केल्याच्या आरोपाखाली एका व्यक्तीची फाशी दिली आहे. कौरोश केयवानी नावाच्या व्यक्तीला मोसादला संवेदनशील ठिकाणांची माहिती पुरवल्याप्रकरणी मृत्युदंड देण्यात आला.

## 'एक देश, एक निवडणूक' समितीचा कार्यकाळ वाढवला

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**नवी दिल्ली :** लोकसभा आणि राज्य विधानसभांच्या निवडणुका एकाच वेळी घेण्याच्या प्रस्तावाशी संबंधित विधेयकांची तपासणी करणाऱ्या संसदेच्या संयुक्त समितीचा कार्यकाळ लोकसभेने बुधवारी वाढवला. हा कार्यकाळ आता २०२६ च्या पावसाळी अधिवेशनाच्या शेवटच्या आठवड्याच्या पहिल्या दिवसापर्यंत राहणार आहे.

समितीचे अध्यक्ष पी. पी. चौधरी यांनी याबाबतचा प्रस्ताव लोकसभेत मांडला. त्यांनी संविधान (१२९ वी दुरुस्ती) विधेयक, २०२४ आणि केंद्रशासित प्रदेश कायदे (दुरुस्ती) विधेयक, २०२४ यांची छाननी करण्यासाठी समितीला अधिक वेळ देण्याची मागणी केली. हा प्रस्ताव लोकसभेने आवाजी मतदानाने मंजूर केला. ही संयुक्त समिती डिसेंबर २०२४ मध्ये स्थापन करण्यात आली होती. समितीने आतापर्यंत घटनातज्ज्ञ, अर्थतज्ज्ञ, विधी आयोगाचे सदस्य तसेच विविध राजकीय नेत्यांशी चर्चा केली आहे. गुलाम नबी आझाद यांच्यासह अनेक मान्यवरांनी समितीसमोर आपली मते मांडली आहेत. लोकसभा आणि राज्य विधानसभांच्या निवडणुका एकाच वेळी घेण्यासंबंधीची ही विधेयके १७ डिसेंबर २०२४ रोजी लोकसभेत सादर करण्यात आली होती. त्यानंतर पुढील तपासणीसाठी ती संयुक्त समितीकडे पाठवण्यात आली. ३९ सदस्यीय बहुपक्षीय समितीची पहिली बैठक ८ जानेवारी २०२५ रोजी झाली होती.

या समितीसमोर आयएमएफच्या माजी प्रथम उपव्यवस्थापकीय संचालक गीता गोपीनाथ यांनीही आपले मत मांडले आहे. तसेच भारताचे माजी सरन्यायाधीश संजीव खन्ना, यू. यू. ललित, डी. वाय. चंद्रचूड आणि जे. एस. खेहर हेही समितीसमोर हजर झाले आहेत. 'एक देश, एक निवडणूक' या महत्त्वाच्या प्रस्तावावर समितीचा सखोल अभ्यास सुरू असून, त्यासाठीच कार्यकाळ वाढवण्यात आल्याचे मानले जात आहे.

## राज्यसभेत 'घोडेबाजार' झाल्याचा आरोप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** राष्ट्रीय जनता दलाच्या खासदार मीसा भारती यांनी राज्यसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर घोडेबाजार आणि राजकीय दबाव टाकल्याचा गंभीर आरोप बुधवारी केला. बिहारमधील पाच जागांसाठी झालेल्या लढतीत महागठबंधनच्या आमदारांची अनुपस्थिती ही नैसर्गिक नसून त्यामागे सीबीआय, ईडी आणि आयकर विभागाच्या दबावाचे राजकारण असल्याचा दावा त्यांनी केला.

मीसा भारती म्हणाल्या की, पाच जागांसाठी सहा उमेदवार मैदानात असल्याने एका उमेदवाराचा पराभव निश्चित होता. अशा वेळी आरजेडीचा एक आणि काँग्रेसचे तीन आमदार मतदानाला गैरहजर राहिले, त्यामुळे संशय अधिकच गडद झाला. यामुळे पक्षांतर्गत घोडेबाजार झाल्याची शक्यता नाकारता येत नाही, असेही त्यांनी पत्रकारांशी बोलताना म्हटले.

मीसा भारतींनी भाजपवर आरोप करताना म्हटले की, काही आमदारांवर प्रलंबित प्रकरणांचा आधार घेत त्यांना धमकावण्यात आले. बिहारमधील राजकीय घडामोडींमध्ये 'कॅरट अँड स्टिक' नीती वापरून महागठबंधनचे नुकसान करण्यात आल्याचा आरोपही आरजेडी आणि काँग्रेसकडून करण्यात आला आहे.

दरम्यान, बिहारमधील राज्यसभा निवडणुकीत एनडीएने सर्व पाच जागांवर विजय मिळवला. त्यात नितीश कुमार यांच्यासह एनडीएचे उमेदवार विजयी ठरल्याचे वृत्त समोर आले. राज्यातील विरोधकांमध्ये गैरहजेरी आणि क्रॉस-व्होटिंगचा फटका बसल्याचेही अहवालांत नमूद करण्यात आले आहे. याच दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यसभेत निवृत्त होणाऱ्या सदस्यांचे योगदान गौरवले आणि त्यांच्या भावी सार्वजनिक जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. यासंदर्भातील अधिकृत माहिती प्रेस इन्फॉर्मेशन ब्युरोने १८ मार्च २०२६ रोजी प्रसिद्ध केली आहे.

## बँक ग्राहकाच्या सूचनांचे उल्लंघन करू शकत नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** ग्राहकाने दिलेल्या स्पष्ट सूचनांविरुद्ध जाऊन बँक स्वमर्जीने निधी इतरत्र वळवू शकत नाही, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. ग्राहकाच्या आदेशांचे काटेकोर पालन करणे बँकेवर कायदेशीरदृष्ट्या बंधनकारक असल्याचे स्पष्ट करत न्यायालयाने चुकीच्या निधी हस्तांतरणाबद्दल कॅनरा बँकेला जबाबदार धरले.

ही बाब कॅनरा बँक ओव्हरसीज ब्रँच, आर्चियन इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड आणि दुबईस्थित गोल्टेन्स कंपनी यांच्यातील व्यवहाराशी संबंधित आहे. सर्वोच्च न्यायालयाने मद्रास उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवत बँकेचे आणि आर्चियन इंडस्ट्रीजचे अपील फेटाळले. या प्रकरणात न्यायमूर्ती जे. बी. पार्डीवाला आणि आर. महादेवन यांच्या खंडपीठाने सुनावणी केली.

जहाज दुरुस्तीच्या थकबाकीपोटी १,००,००० अमेरिकन डॉलर्स गोल्टेन्सला पाठवण्याची व्यवस्था करण्यात आली होती. आर्चियन इंडस्ट्रीजने कॅनरा बँकेला ती रक्कम गोल्टेन्सला पाठवण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या होत्या. मात्र, बँकेने ती रक्कम गोल्टेन्सला न पाठवता चुकून अमेरिकेतील जहाजमालकाच्या खात्यात जमा केली. यानंतर गोल्टेन्सने आर्चियन इंडस्ट्रीज आणि कॅनरा बँक या दोघांविरुद्ध वसुलीचा दावा दाखल केला होता. आर्चियन इंडस्ट्रीजने आपण बँकेला सूचना देऊन आपली जबाबदारी पूर्ण केल्याचा युक्तिवाद केला, तर कॅनरा बँकेने नियामक मंजुरीशिवाय तृतीय पक्षाला निधी पाठवता येत नसल्याचे सांगत आपली बाजू मांडली. ग्राहकाने स्पष्ट सूचना दिल्यानंतर बँकेने त्या सूचनांचे पालन करणे, किंवा शंका असल्यास स्पष्टीकरण मागणे, एवढेच करणे अपेक्षित होते; परंतु बँकेला एकतर्फीपणे निधी दुसरीकडे वळवण्याचा अधिकार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

न्यायालयाने असेही नमूद केले की, आरबीआयची मंजुरी आवश्यक असल्याचा मुद्दा असला तरी बँकेने ती रक्कम थांबवून ग्राहकाच्या पुढील सूचनांची प्रतीक्षा करायला हवी होती. संबंधित निधी हा ग्राहकाचा असल्याने त्याच्या आदेशाच्या विरोधात जाऊन रक्कम पाठवणे कोणत्याही परिस्थितीत योग्य ठरू शकत नाही, असे खंडपीठाने स्पष्ट केले. या निर्णयात सर्वोच्च न्यायालयाने आर्चियन इंडस्ट्रीज गोल्टेन्सला देय रकमेबाबत जबाबदार असल्याचे मान्य केले, नुकसानीची वसुली बँकेकडून करण्यास ती पात्र असल्याचेही स्पष्ट केले.

## सारा अली खान प्रकरणावर कंगनाची प्रतिक्रिया

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** बॉलिवूड अभिनेत्री सारा अली खानच्या केदारनाथ मंदिर भेटीच्या संदर्भात नव्या नियमावरून वाद निर्माण झाला आहे. बद्रीनाथ-केदारनाथ मंदिर समितीने गैर-सनातनी व्यक्तींच्या मंदिर परिसर आणि गर्भगृहातील प्रवेशावर निर्बंध घालण्याचा प्रस्ताव मंजूर केल्यानंतर या मुद्द्यावर राजकीय आणि सामाजिक प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत.

मंदिर समितीच्या १० मार्च रोजी झालेल्या बैठकीत बद्रीनाथ आणि केदारनाथ मंदिर परिसर तसेच गर्भगृहात गैर-सनातनी व्यक्तींना प्रवेशबंदी करण्याचा प्रस्ताव एकमताने मंजूर करण्यात आला.

या प्रस्तावानुसार, सनातन धर्मावरील श्रद्धेबाबत प्रतिज्ञापत्र दिल्यास संबंधित व्यक्तींना मंदिर दर्शनाची परवानगी दिली जाऊ शकते.

या पार्श्वभूमीवर लोकसभा खासदार कंगना रानावत यांनी प्रतिक्रिया देताना, "प्रत्येकजण सनातनी आहे. मग ते लेखी स्वरूपात सादर करण्यात काय अडचण आहे?" असा सवाल उपस्थित केला.

सनातन म्हणजे ज्याला आरंभ आणि अंत नाही, असे सांगत त्यांनी सत्य लिहिण्यास कचरू नये, असेही मत व्यक्त केले. बद्रीनाथ-केदारनाथ मंदिर समितीचे अध्यक्ष हेमंत द्विवेदी यांनी स्पष्ट केले की, सनातन धर्मावर श्रद्धा असल्याचे प्रतिज्ञापत्र दिल्यास सारा अली खान किंवा इतर कोणत्याही गैर-हिंदू व्यक्तीला मंदिर भेटीस परवानगी दिली जाऊ शकते. "ज्यांची सनातन धर्मावर श्रद्धा आहे आणि जे स्वतःला सनातनी मानतात, त्यांचे स्वागत आहे," असे त्यांनी सांगितले.

द्विवेदी यांच्या मते, समितीने प्रतिज्ञापत्राचा मसुदाही तयार केला असून हा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठविण्यात आला आहे.

### सर्वोच्च न्यायालयाची शेरेबाजी

## ममता यांची उपस्थिती 'असामान्य'

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) टाकलेल्या छाप्यादरम्यान पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांची 'आय-पॅक' कार्यालयातील उपस्थिती ही "सुखद परिस्थिती" नसल्याचे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी नोंदवले. अशा "असामान्य" परिस्थितीत केंद्रीय यंत्रणांकडे कोणताही कायदेशीर उपाय असू नये का, असा सवाल न्यायालयाने राज्य सरकारला केला. पुढील सुनावणी २४ मार्च रोजी होणार आहे.

न्यायमूर्ती प्रशांत कुमार मिश्रा आणि एन. व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठासमोर ईडीची याचिका सुनावणीस आली. यावेळी न्यायालयाने विचारले की, "उद्या एखाद्या दुसऱ्या राज्याचा मुख्यमंत्रीही अशाच छाप्याच्या ठिकाणी गेला, तर ईडीने काय करायचे?" केंद्रीय यंत्रणेच्या कारवाईत अशा प्रकारे हस्तक्षेप झाल्यास त्यावर कोणती दाद मिळणार, हा न्यायालयाचा मुद्दा होता.

ईडीने सर्वोच्च न्यायालयात दावा केला आहे की, आय-पॅक प्रमुख प्रतीक जैन यांच्या घर आणि कार्यालयावर टाकलेल्या छाप्यादरम्यान मुख्यमंत्री बॅनर्जी घटनास्थळी पोहोचल्या आणि तेथून लॅपटॉप, मोबाईल फोन व काही कागदपत्रे नेण्यात आली. या कृतीला ईडीने "सत्तेचा घोर गैरवापर" म्हटले असून संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

पश्चिम बंगाल सरकारतर्फे ज्येष्ठ वकील श्याम दिवाण यांनी युक्तिवाद करताना म्हटले की, केंद्र सरकारच्या एखाद्या विभागाला राज्य सरकारविरुद्ध थेट याचिका दाखल करण्याची परवानगी देणे हे संघराज्य रचनेसाठी घातक ठरू शकते. सीबीआय, एनसीबी, डीआरआय किंवा एसएफआयओसारख्या तपास यंत्रणांना राज्य सरकारवर थेट खटला दाखल करण्याचा अधिकार नाही, अशी बाजू त्यांनी मांडली.

न्यायालयाने यावर चिंता व्यक्त करत म्हटले की, जर मुख्यमंत्र्यांच्या पातळीवरूनच केंद्रीय यंत्रणेच्या कामात अडथळा आणला गेला, तर अशा परिस्थितीत काय करायचे, याचे उत्तर आवश्यक आहे.

अनुच्छेद २२६ किंवा ३२ अंतर्गतही दाद मागता येत नसेल, तर निर्णय कोण घेणार, असा प्रश्न खंडपीठाने उपस्थित केला. या प्रकरणात पुढील सुनावणी २४ मार्च २०२६ रोजी होणार असून, ईडीची याचिका ग्राह्य धरता येते का, या प्राथमिक प्रश्नावरच पुढील टप्प्यात अधिक सुनावणी अपेक्षित आहे.

## संकटमोचक - इराणला मानवतावादी मदत

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली/तेहरान :** मध्य पूर्वेतील तीव्र संघर्षाच्या पार्श्वभूमीवर भारताने इराणला वैद्यकीय मदतीची पहिली खेप पाठवली आहे. बुधवारी ही मदत तेहरानमधील इराणी रेड क्रेसेंट सोसायटीकडे सुपूर्द करण्यात आल्याची माहिती समोर आली. भारतातील इराणी दूतावासानेही ही मदत मिळाल्याची पुष्टी करत भारत सरकार आणि भारतीय नागरिकांचे आभार मानले आहेत.

इराणी दूतावासाने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात, भारताच्या नागरिकांकडून वैद्यकीय मदतीची पहिली खेप इराणी रेड क्रेसेंट सोसायटीला सुपूर्द करण्यात आली आहे. आम्ही भारताच्या दयाळू लोकांचे मनःपूर्वक आभार मानतो, असे म्हटले आहे. दूतावासाने मदत पोहोचल्याचे फोटो आणि व्हिडिओही शेअर केले आहेत.

या मदतीत औषधे आणि वैद्यकीय साहित्याचा समावेश असून, संघर्षग्रस्त भागांतील जखमी नागरिकांच्या उपचारासाठी त्याचा उपयोग होणार आहे. सुरू असलेल्या हल्ल्यांमुळे इराणमधील रुग्णालयांवर आणि आपत्कालीन यंत्रणांवर ताण वाढला आहे. आंतरराष्ट्रीय रेड क्रॉस-रेड क्रेसेंट महासंघानेही १० मार्च २०२६ रोजी जाहीर केले होते की, इराणी रेड क्रेसेंट सोसायटी मोठ्या प्रमाणावर बचाव, वैद्यकीय मदत आणि आपत्कालीन सहाय्य कार्यात गुंतली आहे, मात्र गरज त्यापेक्षा खूप मोठी आहे.

संघर्षाची तीव्रता वाढल्याचे विविध अहवालांतून दिसते. काही वृत्तांनुसार, हा संघर्ष उशिरा फेब्रुवारीपासून वाढत गेला असून नागरी भाग, आरोग्य सुविधा आणि अत्यावश्यक सेवांवर त्याचा मोठा परिणाम झाला आहे. इराणी रेड क्रेसेंटच्या माहितीनुसार, हजारो जखमी आणि मोठ्या प्रमाणावर नागरी हानी झाल्याचे संकेत आहेत. भारताकडून पाठवलेली ही वैद्यकीय मदत मानवतावादी दृष्टिकोनातून महत्त्वाची मानली जात आहे. युद्धाच्या छायेत सामान्य नागरिकांपर्यंत जीवनावश्यक मदत पोहोचवण्याचा हा प्रयत्न असल्याचे मानले जात आहे.

## काँग्रेस खासदाराचा भाजपमध्ये प्रवेश

**नवी दिल्ली :** आसाम राज्यात निवडणुकीच्या तोंडावर मोठी राजकीय उलथापालथ झाली आहे. काँग्रेसचे खासदार प्रद्युत बोरदोलोई यांनी मंगळवारी आपल्या खासदारकीचा राजीनामा दिल्यानंतर अवघ्या २४ तासांत भाजपमध्ये प्रवेश केला. राज्याचे मुख्यमंत्री हिमंत बिस्वा सरमा यांच्या निमंत्रणावरून बोरदोलोई यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. पक्ष प्रवेशानंतर सरमा यांनी विधानसभा निवडणुकीत त्यांना उमेदवारी देण्याची शिफारस नेतृत्वाकडे करणार असल्याचे संकेत दिले

## सर्वोच्च न्यायालयाचा भरती प्रकरणी उमेदवारांना दिलासा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** भरती परीक्षेतील एका प्रश्नाच्या योग्य उत्तरावर उच्च न्यायालयातील न्यायाधीशांमध्येच मतभेद झाल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. चंदीगड महानगरपालिकेला लॉ ऑफिसर पदासाठी दोन उमेदवारांची नियुक्ती करण्याचे आदेश देताना, त्यासाठी एक अतिरिक्त पद निर्माण करण्यासही न्यायालयाने सांगितले आहे.

या प्रकरणात भरती परीक्षेतील एका प्रश्नाच्या उत्तरावरून वाद निर्माण झाला होता. संबंधित प्रश्नाचे योग्य उत्तर कोणते, याबाबत उच्च न्यायालयातील न्यायाधीशांमध्ये भिन्न मते नोंदवली गेली होती. या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने उमेदवारांवर अन्याय होऊ नये, या दृष्टीने हस्तक्षेप केला.


न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार, चंदीगड महानगरपालिकेने लॉ ऑफिसर पदावर दोन्ही उमेदवारांना सामावून घ्यावे. त्यासाठी आवश्यक असल्यास अधिसंख्य पद निर्माण करावे, असे स्पष्ट करण्यात आले.

भरती प्रक्रियेत निर्माण झालेल्या तांत्रिक वादामुळे पात्र उमेदवारांना संधी नाकारता येणार नाही, असा स्पष्ट संदेश या निर्णयातून देण्यात आल्याचे मानले जात आहे. हा निकाल भरती प्रक्रियेतील पारदर्शकता आणि न्याय्यतेच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जात आहे.

### केंद्र सरकारकडून आयटी कायद्यात बदलांचा विचार

# समाज माध्यमांवरील निर्बंधांत आणखी वाढ होणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** सोशल मीडियावरील मजकूर ब्लॉक करण्याच्या अधिकारांबाबत केंद्र सरकार मोठा बदल करण्याच्या तयारीत असल्याची माहिती समोर आली आहे. आयटी अधिनियम २००० मधील कलम ६९अ अंतर्गत सध्या प्रामुख्याने केंद्राच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयामार्फत अशा प्रकारची कारवाई केली जाते. मात्र, या अधिकारांचे विकेंद्रीकरण करून गृह, संरक्षण आणि परराष्ट्र मंत्रालयांसह काही अन्य यंत्रणांनाही थेट आदेश देण्याची मुभा देण्याबाबत चर्चा सुरू असल्याचे वृत्त आहे.

माध्यमातील वृत्तानुसार, या विषयावर केंद्र सरकारच्या आंतर-मंत्रालयीन पातळीवर विचार सुरू आहे. प्रस्तावित बदलानुसार, इन्स्टाग्राम, फेसबुक, युट्यूबसारख्या प्लॅटफॉर्मना केवळ एका मंत्रालयाकडून नव्हे, तर सरकारमधील विविध मंत्रालयांकडूनही कंटेंट ब्लॉक करण्याचे आदेश मिळू शकतात. या बदलामागे दिशाभूल करणाऱ्या, राष्ट्रीय सुरक्षा किंवा सार्वजनिक सुव्यवस्थेला बाधा आणणाऱ्या ऑनलाइन मजकुरावर अधिक जलद आणि समन्वित नियंत्रण मिळवण्याचा उद्देश असल्याचे सांगितले जात आहे.

सध्याच्या व्यवस्थेनुसार, आयटी अधिनियमातील कलम ६९अ अंतर्गत सरकारला सार्वभौमत्व, अखंडता, संरक्षण, राज्याची सुरक्षा, सार्वजनिक सुव्यवस्था किंवा परराष्ट्र संबंधांना धोका पोहोचवणारी माहिती ब्लॉक करण्याचा अधिकार आहे. या अधिकाराचा वापर पूर्वी मेइटीकडून विविध ॲप्स आणि ऑनलाइन माहितीवर बंदी घालण्यासाठी करण्यात आल्याची अधिकृत नोंदही आहे.

दरम्यान, डिसेंबर २०२५ पर्यंत 'सहयोग' पोर्टल हे विविध सरकारी एजन्सींना कलम ७९(३) (ब) अंतर्गत प्लॅटफॉर्मना नोटिसा पाठवण्यासाठी एकल-खिडकी यंत्रणा म्हणून वापरात आल्याचेही वृत्तांमधून समोर आले होते. आता त्याच धर्तीवर ६९अ प्रक्रियेचेही विकेंद्रीकरण करण्याचा विचार सुरू असल्याचे संकेत आहेत. यामुळे कंटेंटविषयक आदेशांची प्रक्रिया अधिक वेगवान होऊ शकते, मात्र त्याचवेळी अभिव्यक्तिस्वातंत्र्य, प्रक्रियात्मक हमी आणि पारदर्शकतेबाबत नवे प्रश्नही उपस्थित होण्याची शक्यता आहे.

याच पार्श्वभूमीवर फेब्रुवारी २०२६ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या आयटी नियमांच्या दुरुस्तीमध्ये काही प्रकारचा आक्षेपार्ह मजकूर संबंधित मंत्रालयाकडे पाठवून पुढील कारवाईसाठी 'ओव्हरसाइट मेकॅनिझम'कडे संदर्भित करण्याची तरतूद दिसून येते. मात्र, गृह, संरक्षण आणि परराष्ट्र मंत्रालयांना थेट ६९अ अंतर्गत अंतिम ब्लॉकिंग अधिकार देण्यात आले आहेत, अशी अधिकृत अधिसूचना अद्याप सार्वजनिकरीत्या दिसून आलेली नाही. त्यामुळे सध्या हा बदल 'विचाराधीन' अवस्थेत असल्याचेच मानले जात आहे.

सरकारच्या हालचालींनुसार, भविष्यात सेबीसारख्या इतर संस्थांनाही विशिष्ट प्रकारच्या दिशाभूल करणाऱ्या ऑनलाइन मजकुराविरोधात अधिक थेट अधिकार देण्याबाबत विचार होऊ शकतो, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र, कोणताही अंतिम कायदेशीर बदल लागू होण्यासाठी अधिसूचना, नियम दुरुस्ती किंवा स्पष्ट प्रशासकीय आदेश आवश्यक असतील.